गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०७.०६.२०२५ | अंक नं. ५८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी — खरेदीवर पॉईंट — पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## मोफत साड्या व चप्पल मिळवून देण्याच्या आमिषाने २ भामट्यांनी महिलेचे दागिने, मोबाईल व पैसे पळविले

### मंगलगेट परिसरातील घटना

नगर - संजय गांधी निराधार योजनेचे पैसे काढण्यासाठी गेलेल्या महिलेला दोन अनोळखी इसमांनी आमच्या बरोबर चला, एका ठिकाणी महिलांसाठी मोफत साड्या व चप्पल वाटप सुरु आहे. आम्ही ते तुम्हाला मिळवून देतो अशी बतावणी करत भुरळ पाडून त्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत, रोख रक्कम व मोबाईल असा ऐवज चोरुन नेल्याची घटना शहरातील मंगलगेट येथे ६ जून रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत आशा भाऊ बुलाखे (वय ५५, रा. इरिगेशन ऑफिसजवळ, छत्रपती संभाजीनगर रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या संजय गांधी निराधार योजनेचे योजनेचे पैसे काढण्यासाठी मंगल गेट परिसरात गेल्या होत्या. त्यावेळी एक अनोळखी इसम त्यांचा पाठलाग करीत होता. तो इसम फिर्यादी यांना म्हणाला माझ्यासोबत चला मी तुम्हाला साड्या व चप्पल घेऊन देतो तेथे एक मोठा साहेब साड्या व चप्पल वाटत आहे, असे बोलून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

फिर्यादी या त्याच्यासोबत गेल्या. त्याने मंगलगेट येथील एका दुकानाबाहेर फिर्यादी यांना बसवले. त्यानंतर त्याचा एक साथीदार तेथे आला व फिर्यादी जवळ असलेली पिशवी शेजारी ठेवून म्हणाला तुम्ही तुमच्या गळ्यात असलेले सोन्याची दागिने पिशवीमध्ये ठेवा येथे खूप चोऱ्या होतात. असे म्हटल्याने फिर्यादी यांनी त्यांच्या गळ्यातील ६ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, मोबाईल, ५ हजार रुपये रोख रक्कम पिशवीमध्ये ठेवले.

त्यानंतर दोघांनी फिर्यादीची दिशाभूल करुन फिर्यादी शेजारी असलेली पिशवी घेऊन तिथून निघून गेले. थोड्यावेळाने फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी अनोळखी इसमाना पाहिले असता ते दिसून आले नाही. तेव्हा फिर्यादी यांनी मोठमोठ्याने आरडाओरडा केला असता तेथे लोकांची गर्दी जमा झाली. त्यांनी फिर्यादी यांना पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार द्या असे सांगितले. त्यानंतर आशा बुलाखे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी दोन अनोळखी चोरट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार सुनील आंधळे हे करीत आहे.

सुवर्णसंधी
महिलांना/मुलींना खात्रीशीर टू व्हिलर (मोपेड) शिकवली जाईल.
7448149090

पाहिजेत
शैक्षणिक अकॅडमी साठी कॉम्प्युटर चे ज्ञान असलेले Graduate रिसेप्शनिस्ट पाहिजे
7276689011

आपला माणूस. आपला चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व आमचा चहा एक वेळेस जरूर तुलना करून पहा
रत्नकमल चहा
आशिष ट्रेडर्स
आसाम चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते.
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर - ४१४ ००१
Contact : 87673 69367

## रिक्षाने प्रवास करताना महिलेच्या दागिन्यांची चोरी

### सहप्रवासी २-३ महिलांवर चोरीचा संशय, गुन्हा दाखल

नगर - नगरच्या माळीवाडा बसस्थानकाजवळून केडगावपर्यंत रिक्षाने प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधून सोन्या चांदीचे दागिने चोरीला गेल्याची घटना ६ जून रोजी दुपारी २.४५ ते ३.३० वाजेच्या दरम्यान घडली. या महिलेबरोबरच आणखी २-३ महिला या रिक्षातून प्रवास करत होत्या. त्यांनीच ही चोरी केली असावी असा संशय असून पोलिसांनी गुन्हा दाखल करत त्या महिलांचा शोध सुरु केला आहे.

याबाबत मोनिका राहुल आंधळे (वय २५, रा. कर्जुले हर्या, ता. पारनेर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आंधळे यांना चास येथे जायचे होते, त्यामुळे त्यांनी माळीवाडा बसस्थानकाशेजारी उभ्या असलेल्या रिक्षा चालकाला विचारले. त्याने भाडे सांगितल्यावर त्या रिक्षात बसल्या. रिक्षात अगोदरच २-३ महिला बसलेल्या होत्या. रिक्षा नगरहून केडगावमध्ये अंबिकानगर बसस्टॉपजवळ गेल्यावर त्या २-३ महिला तेथे उतरल्या.

त्यानंतर रिक्षा चालकाने फिर्यादी आंधळे यांना तुम्हीही येथे उतरा व दुसऱ्या वाहनाने चास येथे जा असे सांगितले. त्यामुळे त्या खाली उतरल्या. तेथे त्यांनी त्यांची पर्स उघडून पाहिली असता त्यात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने त्यांना दिसून आले नाहीत. त्यानंतर त्यांनी त्या सहप्रवासी महिलांचा शोध घेतला परंतु त्या आढळून आल्या नाहीत. त्यामुळे आंधळे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात येवून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अनोळखी संशयित महिलांवर गुन्हा दाखल केला आहे.

## कोठला परिसरात रात्रीच्यावेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पोलिसांच्या पथकाने पकडले

नगर - मध्यरात्रीच्या सुमारास अंधारात संशयीतरित्या फिरुन एखादा अपराध करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसलेल्या दोघांना तोफखाना पोलिसांनी पकडले. ही कारवाई कोठला येथील यामाहा शोरुम जवळ ६ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास केली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस कोठला परिसरात रात्र गस्त घालत असताना त्यांना यामाहा शोरुम जवळ दोघे तरुण अंधारात संशयितरित्या वावरताना मिळून आले. पोलिसांनी त्यांना त्यांची नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिकेत शंकर वाकळे (वय २५, रा. टिळक रोड, अ.नगर), परवेज मेहमुद शेख, (वय २२, रा. इंपिरीयल चौक, बुरुडगांव रोड, अ.नगर) असे असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांची विचारपुस केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे देवुन त्यांनी समाधान कारक उत्तरे दिली नाही, यावरुन ते रात्रीच्या वेळी एखादा अपराध करण्याच्या उद्देशाने स्वतःचे अस्तित्व लपवुन संशयीतरित्या फिरताना मिळून आल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पो. कॉ. विशाल कुलकर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनिकेत वाकळे, परवेज शेख यांचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुरुषांसाठी प्रिमियम कॉलिटी
टी-शर्ट / शर्टस् / फॉरमल पँट ट्राऊजर्स / नाईट पँट
भरपूर व्हरायटीज्
मर्यादित स्टॉक
काहीही घ्या ₹ 200 ला एक व ₹ 500 मध्ये तीन
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८

## मनपाच्या गाड्यांवरील अहिल्याबाई होळकर यांच्या नावाचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

नगर - महानगरपालिकेचे जेव्हापासून प्रशासक नेमले गेले तेव्हापासून महापालिकेच्या चाललेल्या मनमानी कारभारामुळे आता अधिकाऱ्यांची नगर शहराशी वाट लावण्याची जणू काही स्पर्धाच लागली असल्याचे दिसते. अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर करावयाच्या वादविवादात चालू असतानाच महापालिका आयुक्त यांनी नगर शहरातील महापालिकेचे नाव टाकलेल्या अहिल्यानगर नावाचे फलक महापालिकेवर लावले. महापालिकेच्या प्रत्येक वाहनावर बदलण्याचे आदेश दिले तसेच शासकीय कामकाजाला सुद्धा अहिल्याबाई होळकर यांचे नाव देऊन अहिल्यानगर हे नाव वापरण्याचे आदेश दिल्याचे समजते. आयुक्तांनी नगर शहरात मोठ्या प्रमाणात स्वच्छतेसाठी मोहीम राबविली परंतु त्यांच्या नगर शहरात फिरणाऱ्या त्यांच्या वाहनांकडे त्यांचे लक्ष का गेले नाही? जे वापरले जाणारे घन कचऱ्याची वाहने आहेत त्यावर सरळ शब्दात अहिल्यानगराच्या जागी (हेल्या नगर) हे टाकून त्या गाड्या संपूर्ण




नगर शहरात फिरताना दिसत आहेत. हे सरळ सरळ राजमाता अहिल्याबाईचा अपमान झाल्याचे दिसून येते. तसेच त्या कार्यप्रणाली कोणाच्या गाड्यांवर नंबर प्लेट नाही व मोठ्या प्रमाणात वाहनचालकाकडे लायसन्स सुद्धा नाही तरी याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी शहर विकास दक्षता मंचच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात अध्यक्ष विजय घासे यांनी म्हटले आहे की, नगर शहरातील प्रशासकीय पातळीवरुन चालणाऱ्या निष्काळजी व अपमानकारक कृतीमुळे अहिल्याबाई होळकर यांच्या नावाचा अवमान होत आहे. आमची मागणी हीच आहे की, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नगर शहराचा व अहिल्याबाईंचा सन्मान राखावा, असे नगर शहर दक्षता विकास मंच यांच्यावतीने मागणी करण्यात आली आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाठी व चुरमा व दररोज आमरसचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर. पार्सल सुविधा उपलब्ध...

VIDYADAAN SCIENCE ACADEMY
From Dropper to Doctor...
(Transform your mistakes to milestones)
JOIN VIDYADAAN NEET RE-IGNITE BATCH
• Expert Mentorship
• XI + XII NEET Syllabus
• Weekly Testing & Performance Monitoring
• Strategy for 650 + Score in NEET
Batch Starts 12th June 2025
Current Class XII feeling Underprepared can also join
9225522174 I 8308667003 I 8237653801

# गृहिणी

## आरोग्य

### ब्लूबेरी खा निरोगी रहा...

भारतात ब्लूबेरीला अजूनही 'विदेशी फळ' मानले जाते, परंतु आरोग्याबाबत जागरूक लोक त्यांच्या दैनंदिन आहारात त्याचा समावेश करत आहेत. यामागील कारण म्हणजे त्यात लपलेला पोषणाचा खजिना. व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्सने समृद्ध असलेले हे फळ केवळ रोगप्रतिकारक शक्ती वाढवतेच असे नाही तर हृदय, मेंदू आणि त्वचेसाठी देखील उत्तम आहे. ब्लूबेरीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तो रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई आणि फायटोन्यूट्रिएंट्स शरीराला विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशीजन्य संसर्गाशी लढण्याची शक्ती देतात. बदलत्या हवामानात वारंवार आजारी पडणाऱ्या किंवा लवकर थकणाऱ्यांसाठी ब्लूबेरी आयुर्वेदिक औषधापेक्षा कमी नाहीत. तुम्ही ते तुमच्या दैनंदिन आहारात स्मूदी, ओट्स, दही किंवा ज्यूसच्या स्वरूपात समाविष्ट करू शकता.

## पाककला

### हिरव्या टोमॅटोची चटणी

**साहित्य :** ३ हिरवे टोमॅटो, १ कांदा बारीक चिरलेला, ५ ते सहा लसूण पाकळ्या, आल्याचा छोटा तुकडा, २ हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, मीठ चवीनुसार, २ टेबलस्पून तिळाचे कूट, १ टेबलस्पून तेल, कढीपत्ता, १/२ टीस्पून जीरे,

**कृती :** सर्वप्रथम कढईमध्ये कांदा आले लसूण थोड्याशा तेलात परतावे त्यातच टोमॅटोच्या फोडी करून घालाव्यात आणि मीठ वरून पसरावे. झाकण ठेवून पाच ते दहा मिनिटे मध्यम आचेवरती शिजू द्यावे. छोटासा गुळाचा खडा किंवा एक चमचाभर साखरही त्यात घालावी जेणेकरून चटणी जास्त आंबट लागणार नाही. आता आता हे शिजलेले टोमॅटो थोडे थंड होऊ द्यावे आणि मिक्सरच्या भांड्यामध्ये घालावे. त्यानंतर त्यात कोथिंबीर तिळाचं कूट घालावा. आता हे मिक्सरला पाणी न घालता चांगले बारीक वाटून घ्यावे. त्यानंतर कढईमध्ये तेलात मोहरी जिऱ्याची फोडणी तयार करावी. त्यात कढीपत्ता घालावा आणि तयार चटणी त्या तेलात ओतावी आणि एकदा छान हलवून घ्यावे.

## वास्तू

### घरासाठी रंग निवडताना

✻ घरासाठी रंग निवडताना, ते पृथ्वी, अग्नी, पाणी, वायू आणि अवकाश या पाच घटकांशी संतुलन साधतील याची काळजी घ्या. योग्य रंग निवडल्याने या नैसर्गिक घटकांशी सुसंगती साधली जाते आणि घरात सकारात्मक वातावरण निर्माण होते.

✻ घरात पृथ्वीशी संतुलन साधण्यासाठी तपकिरी, हिरवा, पांढरा, बेज असे नैसर्गिक रंग निवडा. सजावटीत ताग, बांबू, ऊस, लाकूड, आणि कापूस यासारखी नैसर्गिक साहित्य वापरल्यास शांत आणि साधेपणाचे वातावरण तयार होते.

## सल्ला

तळलेले पदार्थ तेल निथळण्यासाठी न्यूज पेपरमध्ये काढून ठेवू नका, यासाठी टीश्यू पेपर अथवा कोरा पेपर वापरा.

## सौंदर्य

कोरफडीचे जेल चेहऱ्यासाठी तसेच केसांसाठी खूप फायदेशीर आहे. तुम्ही ते थेट तुमच्या केसांवर लावू शकता आणि ते घट्ट करू शकता किंवा तुम्ही हेअर पॅक देखील बनवू शकता आणि इतर कोणत्याही घरगुती उपायाप्रमाणे वापरू शकता. कोरफड तुमच्या टाळूला आराम देते, केसांना कंडिशन करते, कोंडा कमी करते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ८ जून २०२५

**प्रदोष, मृग रवि ०७:१८, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, स्वाती १२।४२, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्या वैवाहिक जीवनात सकारात्मकता आणेल. आज तुम्ही तुमच्या जोडीदाराशी संवाद साधून तुमच्या नात्यातील प्रॉब्लेम्स सोडवाल.

**वृषभ :** कुटुंबातील सदस्यांसोबत पिकनिकला जाण्याचा प्लॅन कराल. नोकरदारांचे सहकार्यांशी वाद होतील.

**मिथुन :** आज तुम्हाला तुमच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल कारण तुमचे जुने आजार आज पुन्हा उद्भवू शकतात.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी आज तुमचे शत्रू तुमचे नुकसान करू शकतात. त्यामुळे आपले काम सांभाळून करा आणि अशा लोकांपासून सावध रहा.

**सिंह :** जर बहिणीशी तुमचा वाद चालू असेल तर आज तिच्याशी संबंध सुधारतील. तुम्हाला तुमच्या एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी ऐकू येईल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप फलदायी असेल. आज व्यवसाय करणाऱ्या लोकांना इच्छेनुसार नफा मिळेल.

**तूळ :** तुमचे शत्रू तुमच्या प्रगतीमुळे नाराज होतील त्यामुळे तुमचा आनंद आज तुमच्यापुरताच मर्यादित ठेवा.

**वृश्चिक :** तुमच्या कुटुंबातील मुलांकडून आज एखादी चांगली बातमी ऐकू येईल. त्यामुळे कुटुंबात उत्सवाचे वातावरण राहील.

**धनु :** आज तुमच्या आईला नेत्रसंबंधी त्रास जाणवेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस अनुकूल परिणाम देणारा असेल.

**मकर :** विद्यार्थ्यांना आज खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल अन्यथा वडिलांची बोलणी ऐकावी लागू शकतात.

**कुंभ :** खाण्याच्या सवयींबाबत काळजी घ्यावी लागेल. कारण पोटाशी संबंधित समस्या तुम्हाला त्रास देऊ शकते.

**मीन :** तुमची प्रदीर्घ प्रलंबित कामे पूर्ण झाल्यामुळे आज तुम्हाला आनंद वाटेल. कोणाकडून पूर्वी कर्ज घेतले असेल तर आज तुम्ही ते फेडण्यात यशस्वी व्हाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१९४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | | ९ | ■ | १० | | | |
| ■ | ११ | | १२ | | ■ | १३ | |
| १४ | | ■ | १५ | | १६ | | ■ |
| १७ | | १८ | ■ | ■ | | ■ | १९ |
| | ■ | २० | | | | ■ | |
| २१ | २२ | ■ | ■ | ■ | २३ | | |
| ■ | २४ | | ■ | २५ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) लोणी कढविल्यानंतर तयार होणारा पदार्थ ३) संयुक्तपणे केलेला विचार किंवा कट ८) निबर; कडक १०) आत न जाता; बाहेरून ११) गोलाकार फिरणारा वारा; चक्रवात १३) बऱ्याच काळापासून मनात राहिलेले दुःख; शल्य १४) सुखदुःख जाणणारे इंद्रिय; माइंड १५) दणकट; बळकट; मजबूत १७) भूल पाडणारे भूत २०) इतर; बाकीचे २१) एक लोकप्रिय पेय २३) याचा स्पर्श झाला असता लोखंडाचे सोने होते असे म्हटले जाते २४) मारल्याची खूण; लांबट उठाणू २५) अतिशय दाट मैत्री

**उभे शब्द :-** १) न्यूनता; नुकसान; हानी २) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज ४) गवळ्याची पत्नी ५) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात ६) धन; वित्त ७) चंचल; क्षणिक; पातळ ९) मिठी; आलिंगन १२) एकसारखे एकीकडेच पाहणे १४) खाताना होणारा तोंडाचा आवाज १६) तासडपट्टी; बोडंती १८) दोन हातांतील जास्तीतजास्त अंतर; मोका; संधी १९) सवड; उसंत २२) प्रबळ इच्छा; अतिलोभ

### शब्दगंध क्र. ७१९३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | चा | र | पू | स | ■ | क | था |
| ना | ■ | ■ | ल | व | क | र | ■ |
| य | तु | ना | ■ | ल | ट | प | ट |
| क | ट | ■ | भा | त | क | ट | ■ |
| ■ | का | ल | बा | ■ | ट | ■ | र |
| बे | ■ | टां | ■ | वा | ■ | का | म |
| स | ह | ब | ■ | न | वा | ज | णी |
| न | ■ | र | वि | वा | र | ■ | य |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** यदि क्रोध अग्नि है, तो मौन वह शीतल जल है जो उसे शांत कर देता है।

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कीबोर्डचा शोध केव्हा लागला?

पहिले आधुनिक कीबोर्ड १८०० च्या उत्तरार्धात आणि १९०० च्या सुरुवातीस टाइपरायटरच्या शोधाने अस्तित्वात आले. त्यानंतर टेलिग्राफ टेलिग्राफसाठी टाइपरायटरची इलेक्ट्रॉनिक आवृत्ती तयार करण्यात आली. सर्वात प्रसिद्ध आवृत्ती SR-३३ असेल. आधुनिक पीसीमध्ये की स्कॅन करण्यासाठी आणि १ किंवा अधिक की कधी दाबल्या जातात आणि सोडल्या जातात हे निर्धारित करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर वापरला जातो, ज्या नंतर कॅरेक्टर किंवा ऑपरेशन्समध्ये रूपांतरित केल्या जातात.

संगणक माऊसचा शोध १९६४ मध्ये डग्लस एंजेलबार्ट यांनी लावला होता. तेव्हापासून ते यांत्रिक ते पूर्णपणे ऑप्टिकल बनले आहे. १९८४ ते १९८६ च्या सुमारास ते लोकप्रिय झाले. इतर पोझिशन इनपुट उपकरणांमध्ये जॉयस्टिक (१९०९), ट्रॅकबॉल, (१९४६), लाईट पेन (१९५६), टचपॅड (१९८२), पॉइंटिंग स्टिक (१९८४) यांचा समावेश आहे.


या सर्व पोझिशन इनपुट उपकरणांपैकी, माऊस सर्वात बहुमुखी असल्याचे सिद्ध झाले आहे. ते कर्सरच्या जलद स्थितीसह संगणकावर दीर्घ सत्रांना अनुमती देते. टचपॅड (आजच्या टच स्क्रीनवर वापरला जाणारा) उपयुक्त आहे, विशेषतः मल्टी-टचसह, परंतु माऊसची स्थिती अचूकता कमी आहे. हलके पेन हे बहुतेक मृत तंत्रज्ञान आहे (कारण ते CRT तंत्रज्ञानासह सर्वोत्तम काम करते), परंतु त्याची जागा टच स्क्रीनने घेतली आहे. इतरांकडे विशिष्ट ठिकाणे आणि अनुप्रयोग आहेत जिथे ते माऊसपेक्षा अधिक उपयुक्त आहेत.

### दंडकारण्य उत्पत्ती

महर्षी अगस्तीचे वास्तव्य दंडकारण्यातील एका आश्रमात होते. तेथे एकदा श्रीराम त्यांच्या दर्शनासाठी गेले असता त्यांनी विचारले, हे एवढे मोठे वन पशुपक्षीविरहित निर्जन, शून्य व भयंकर कसे बनले? या प्रश्नाचे उत्तर देताना अगस्तींनी दंडकारण्याची उत्पत्ती कथा सांगितली ती अशी-

सत्ययुगात इक्ष्वाकू नावाचा धर्मपरायण राजा होता. त्याने अनेक यज्ञ केले. त्याच्या अनेक पुत्रांपैकी सर्वांत धाकटा हा शूर, विद्वान व गुणी होता. राजाने त्याचे नाव दंड असे ठेवले होते. विंध्य पर्वताच्या दोन शिखरांमध्ये मधुमत्त नावाचे नगर वसवून ते त्याला राहायला देण्यात आले. दंडाने पुष्कळ वर्षे तेथे धर्माने राज्य केले. एकदा दंड भार्गव मुनींच्या म्हणजेच शुक्राचार्यांच्या आश्रमापाशी फिरत आला असता, त्यांची सुंदर कन्या अरजा त्याने पाहिली. तिच्या रुपाने मोहित होऊन तो तिला बळजबरीने आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह करू लागला. आपल्या पित्याची परवानगी घेऊन आपल्याला न्यावे, ही तिची विनवणी न ऐकताच राजाने तिच्यावर जबरदस्ती केली व तो निघून गेला.

शुक्राचार्य स्नान करुन शिष्यांसह परत आल्यावर अरजाने रडतरडत ही हकिगत त्यांना सांगितली. अरजाची ती दीन अवस्था पाहून शुक्राचार्य क्रोधीत झाले व शिष्यांना म्हणाले, तुम्ही सर्वांनी या राज्याच्या बाहेर जावे. धर्माविरुद्ध आचरण करणारा हा पापी राजा त्याचा देश, सेवक व सर्व संपत्तीसह नष्ट होईल. धुळीच्या वर्षावानं त्यांचं राज्य नाश पावेल. अरजेला तेथेच ठेवून शुक्र आश्रमासाठी दुसरी जागा शोधण्यासाठी निघून गेले. त्यांच्या म्हणण्यानुसार दंडाचे राज्य एका आठवड्यात जळून खाक झाले. तेव्हापासून हे विंध्य पर्वतावरील ठिकाण दंडकारण्य म्हणून ओळखले जाऊ लागले.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

प्रेम पूर्वक आंतरिक भक्ति और अडिग विश्वास, शिष्य को परलोक के दिव्य परमानंद को पाने में सहायता करते हैं। रूहानियत का अर्थ है हमारा सर्वांगीण विकास। प्रार्थना और कृतज्ञता, एक दूसरे के पूरक हैं। आदर से भरी नम्रता और अक्षरशः आज्ञापालन, आध्यात्मिक उन्नति में बहुत ज्यादा सहायक होते हैं। एक सच्चा सतगुरु हमेशा इस बात पर जोर देता है कि हम रोजाना, मन, वचन और कर्म से, अहिंसा, सचाई, पवित्रता, नम्रता और निष्काम सेवा के क्षेत्रों में की गई गलतियों का लेखा-जोखा रखें। ये पाँच सदाचारी गुण रूहानियत के रास्ते पर चलने के लिए जरूरी हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

इस चक्र पर ध्यान लगाने से ही व्यक्ति की कथनी और करनी एक जैसी होगी। अगर इस चक्र पर ध्यान नहीं लगायेगें तो सोच, कर्म और बोल एक समान नहीं होगें।

अगर हम आज्ञा चक्र पर ध्यान लगाते रहें तो किसी का भी तनाव कम कर सकते हैं। उलझी गतिविधियों को सुधारा जा सकता है।

आज्ञा चक्र का जागरण एकाग्रता से होता है। एकाग्रता अर्थात मन की उर्जा को किसी एक कार्य में लगाये रखना। अगर मन एकाग्र नहीं होता है तो समझो आज्ञा चक्र कमजोर है। दुनिया में दीन हीन लोगों को देख कर समझ लो उन की एकाग्रता नहीं है। जिन में एकाग्रता की कमी है वह बहुत चिंतित, उदास, चिड़चिड़े या सहमें हुये रहते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'उभे राहणारे, उभे करणारे...

जवळपास नव्वदीच्या दरम्यान वय. आजोबा आता थकलेले. नातवाचं आजोबावर विशेष प्रेम. आजोबाचा नातु हा शेवटचा मित्र असतो असं म्हणतात. आजोबांनी खूप चांगले विचार, अनुभव नातवाला वेळोवेळी सांगितलेले. माझे फक्त आजोबा नाहीत तर चांगले मित्र, गुरु आहेत असं समजणारा नातु. हा नातु होता चाळीस वर्षांपूर्वीचा. सोशल मिडिया हा प्रकार त्यावेळी नव्हता. हल्लीचे नातु, आपल्या आजोबांना वेळ देतात ? आजोबा, आज्जीसोबत मनमोकळं बोलतात ? त्यांचे अनुभवं, विचार ऐकतात ? नव्वदीच्या आजोबांना हातांचा आधार देऊन उभे करतात ? आजही असे चांगले नातु आहेत पण हातांच्या बोटांवर मोजण्याइतकेच. चाळीस वर्षापूर्वी आजोबा ह्या नातवाला सांगायचे - अब्जावधी लोकांचं हे जग आहे. सगळेच आपल्या ओळखीचे अथवा नातेवाईक नाहीत. ह्यांतले फक्त दहा, वीस हजार आपले मित्र, परिचित, नातेवाईक. म्हणजे जगाच्या एकुण लोकसंख्येच्या एक टक्काही येत नाही. ह्यातले आपल्यासाठी चांगलं चिंतणारे, वेळोवेळी पाठिशी ऊभे राहणारे, संकटात सोबत करणारे किती ? हा विचार कधी केलास का? केला नसशील तर कर.

एकदा निवांत बसुन तुला सहकार्य करणारांची, तू ज्यांना सहकार्य केलं त्यांची यादी तयार कर. माझ्या बापानंही मला हेच सांगितलं होतं. एकदा मी तसं केलं. ह्यातुन एक लक्षात आलं आपण जसं जगाशी वागणार तसंच जग आपल्याशी वागणार. आपल्याशी काही परिचित, मित्र मंडळी, नातेवाईक असे असतात की स्वार्थ साधण्यासाठीच आपल्याशी जवळीक करतात, आपल्याशी चांगलं बोलतात, आपल्यावर प्रेम आहे असं वेगवेगळ्या माध्यमातुन दाखवतात. त्यांचं काम आपल्याकडुन झालं की ते आपल्या सहवासातुन दूर जातात. आपल्याला हे लक्षात येतं तेव्हा आपल्याला नक्कीच वाईट वाटतं पण कधी-कधी आपण काहीच करु शकत नसतो.

ऐकण्या, पाहण्यापलिकडे आपल्या हातातकाहीच नसतं. तर काही परिचित, मित्र, नातेवाईक निस्वार्थपणे आपल्याला सहकार्य करतात, आपल्यावर प्रेम करतात, चार अनुभव - विचार ऐकवतात, आपल्यावर संकट आलं की अगदी अर्ध्या रात्री आपल्या पाठिशी, आपल्या सोबत असतात. त्यांच्याकडुन सर्वतोपरी सहकार्य करतात, वेळ प्रसंगी आपल्यासाठी वेळ, पैसा खर्चतात परिश्रम सुध्दा घेतात.

अशा ह्या व्यक्तींमुळं आपण भाग्यवान आहोत असं आपल्या लक्षात येतं. कोणताही स्वार्थ नसणाऱ्या ह्या अशा व्यक्ती आपण ओळखल्याच पाहिजेत. ह्याच व्यक्ती आपल्याला चांगल्या अर्थाने उभ्या करणाऱ्या आणि कोणत्याही क्षणी आपल्या मागे ऊभ्या राहणाऱ्या असतात. अशा व्यक्तींचीही नावं मी लिहिली होती. आपल्याला मोठ्या संख्येने मित्र, नातेवाईक, परिचित असावेत असं काहीही नसतं. संख्येपेक्षा ते किती स्वच्छ मनाने, निस्वार्थपणे आपल्या सोबत आहेत हे आपल्याला ओळखता आलं पाहिजे. ऊगवत्या सूर्याला आणि शुन्यातुन विश्व निर्माण करणाऱ्यांना जग नमस्कार करतं हे कायमचं लक्षात ठेव. नातु म्हणाला, बाबा, तुम्ही फार मोलाचे विचार, अनुभव मला सांगता, ह्या विचारांचा, अनुभवांचा मला फार उपयोग होतो. म्हणूनच मी निस्वार्थपणे प्रेम करणाऱ्या, सहकार्य करणाऱ्या मित्र, परिचित, नातेवाईक ह्यांच्या सहवासात राहातो. जेव्हा काहीच अपेक्षा नसते तेव्हाच मैत्री, नातं टिकतं. मागच्या आठवड्यात आमच्या एका मित्राचा अपघात झाल्याचं आम्हाला कळालं. आम्ही लगेच सगळे मित्र, त्याला ॲडमिट केलं त्या दवाखान्यात गेलो.

एका मित्राने रक्तदान करुन त्या मित्राचा जीव वाचवला. आम्ही इतर मित्रांनी त्याच्या औषधोपचाराचा खर्च केला. तो मित्र गरिब परिस्थितीतला आहे पण अत्यंत हुशार, प्रामाणिक आणि निर्मळ मनाचा आहे.' आजोबांना खूप आनंद झाला. म्हणाले, खूप चांगलं केलंत तुम्ही मित्रांनी. असंच चांगलं करा एकमेकांसाठी. एकमेकांना ऊभं करा, एकमेकांच्या पाठिशी ऊभे राहा. तुमच्या ह्या अशा मैत्रीचा आदर्श इतर व्यक्ती नक्कीच घेतील. ....भुतकाळ नातवाच्या डोळ्यांसमोरुन गेला. त्याने आजोबांना घट्ट मिठी मारली. म्हणाला, बाबा, तुमच्यासारखे आजोबा प्रत्येक नातवाला मिळावेत. तुम्ही माझे खुप चांगले मित्र आहात, गुरु आहात.

आता तुम्ही थकलात ते शरिराने पण तुमच्या डोळ्यांतलं माझ्या विषयीचं ममत्व मला स्पष्ट दिसतं. तुमच्या हातांवरच्या, चेहऱ्यावरच्या रेषा काही सांगण्याचा प्रयत्न करतात. झाडांची पानगळ होते पण नवीन पानं पुन्हा जन्म घेतात तसं माणसाचं नाही. पण तुमच्या विचार, अनुभवांची पानं, माझ्या मनातुन कधीच गळुन पडणार नाहीत. तो आजोबांच्या पाया पडला. आजोबांचं थकलेलं शरिर त्याने डोळ्यांत साठवलं. त्या शहरातल्या वृध्दाश्रमात जाऊन तो कोणतंही रक्ताचं नातं नसलेल्या, परिचय नसलेल्या आजोबांची सेवा करु लागला. स्वतःच्या हातांचा आधार देत त्यांना उभं करु लागला.

(लेख क्र.५५३)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**नेत्ररोगतज्ज्ञ :** बाई, नवऱ्याकडे जसे बघता तसे बघा...

**महिला रुग्ण :** पण का?

**नेत्ररोगतज्ज्ञ :** अहो, डोळ्यात ड्रॉप टाकायचा आहे...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या सभापतीपदी कोणाची निवड झाली आहे?

- प्रा. राम शिंदे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

असे सांगितले आहे. म्हणून दात निघण्याच्या काळात उत्पन्न होणाऱ्या आजारांवर बालकाच्या आहारावर नियंत्रण ठेवू नये व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विनाकारण औषधांचा अति वापर करू नये. फक्त आजाराचे स्वरूप जर जास्त प्रमाणात असेल, तर तज्ज्ञ बालरोग चिकित्सकांच्या सल्ल्याने त्या त्या आजारावरचे उपचार करावेत. आयुर्वेदामध्ये दात निघण्याच्या काळामध्ये डिकेमाली चूर्ण हे हिरड्यांवर चोळण्यास सांगितले आहे. यामुळे हिरड्यांची सळसळ थांबून वेदना कमी होतात. तसेच उगवलेल्या दातांनाही लावावी. यामुळे लहान मुलांचे दात सहजपणे, त्रास न होता व लवकर येतात. तसेच दात निघताना येणारा ताप, उलटी, मळमळ, जुलाबासारखे आजार नष्ट होतात. पथ्यापथ्य - दात निघण्याच्या काळात बालक जमिनीवरील कोणतीही वस्तू उचलून तोंडात घालते. यामुळे बालकामध्ये जंतुसंसर्ग वाढतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# बिल्डरशिप : अभिशाप का वरदान?






A TO Z CONSTRUCTION
Driven by Talent.. Powered by Service!
MAHARAJA DEVELOPERS
DREAM HOUSE ASSOCIATES
Nilaya GROUP

(संभाषण)

राहुल :– अरे मला एक २ BHK / 3BHK चा फ्लॅट हवा आहे. तर बघुन मला सांग कुठे असेल ते.

रोहित :– हो आहे माझ्या बघण्यात. पण काही बजेट च्या बाहेर आहेत. आणि जे बजेट मध्ये आहेत पण तेथील लोकेशन बरोबर नाहित.

हाच प्रॉब्लेम होतो आहे यार, असे प्रॉब्लेम आपल्या एरियामध्ये होत आहेत. म्हणून आपल्याला एका चांगल्या बिल्डर ची गरज आहे.

आणि त्यासाठी खालील लेख आहे आपणा सर्वांसाठी ...

फक्त बिल्डिंग बांधणारा बिल्डर असतो हा आपला गैरसमज आहे, तर एक चांगली जागा शोधणे, प्लॅनिंग करणे, टीम मॅनेजमेण्ट करने, काम एक्सिक्युट करणे, केलेले प्रोजेक्ट विकणे आणि पूर्ण झालेल्या प्रोजेक्टला मेन्टेन ठेवणे, हे ज्याला जमते, त्याला 'बिल्डर' असे म्हणतात.

बिल्डरमध्ये काही कॅटेगरी असतात का ?

बिल्डरचे तीन कॅटेगरीमध्ये वर्गीकरण करता येईल,

१) नॉन ट्रॅक बिल्डर
२) बॅड ट्रॅक बिल्डर
३) गुड ट्रॅक बिल्डर

**१. नॉन ट्रॅक बिल्डर –** हे बिल्डर असे असतात त्यांचा बिल्डिंग कामाशी पूर्वी कोणताही प्रकारचा संबंध नसतो. काही वेळेस फक्त आपली जागा आहे, आमुक आमुक ठिकाणी पैसे आहेत, तर बांधकाम करून फ्लॅट / दुकान / बंगला बांधुन विकुन टाकु. बऱ्याचवेळी असा त्यांचा विचार असतो. आणि बऱ्याच वेळी असे बिल्डर नियमावलीचा वापरसुद्धा करत नाही. जसे साईड मार्जिन, वास्तू शास्त्र, पार्कींग सुविधा अश्या बऱ्याच गोष्टी लक्ष्यात घेतल्या जात नाहीत. त्यांचा हेतू फक्त विक्री करून प्रॉफिट कमवण्याचा इतकाच असतो. त्याच्यामुळे ते क्वालिटीकडेही लक्ष देत नाहित.

**२. बॅड ट्रॅक बिल्डर –** हे बिल्डर असे असतात, ज्यांना बांधकाम क्षेत्रात अनुभव आहे. पूर्वी त्यांनी बिल्डिंग बांधल्या आहेत परंतु त्या बिल्डिंगमध्ये काही ना काही प्रॉब्लेम आलेले आहेत, जे बिल्डरने सोडवलेले नाहीत. बऱ्याचदा वेळेवर प्रोजेक्ट पूर्ण न करणे, बांधकामाची क्वालिटी अप टू द मार्क न ठेवणे, प्रत्येक वस्तूत पैसे वाचवणे, होणाऱ्या कामाची मॅनेजमेण्ट न करणे ही सर्व लक्षणे बॅड ट्रॅक बिल्डरचे असतात.

**३. गुड ट्रॅक बिल्डर –** हे बिल्डर असे असतात, जे कस्टमर म्हणून नाही तर आपण स्वतः राहणार आहोत ते आपले स्वतःचे घर आहे अशी वास्तू बांधतात. त्याचे पुर्ण नियमावलीत बांधकाम झालेले असते आणि वेळेवर प्रोजेक्ट पूर्ण करणे व उत्कृष्ठ क्वालिटीमध्ये बांधकाम करणे. कस्टमरचा छोटयात – छोटा प्रॉब्लेम सॉल्व्ह करणे हा त्यांचा हेतु असतो असे बिल्डर गुड ट्रॅक बिल्डर असतात.

**बिल्डरने प्रोजेक्ट करताना काय काय काळजी घेतली पाहिजे.**

**१ सिलेक्शन ऑफ प्लॉट / एरिया –** कोणतीही बिल्डिंग उभी करण्यापूर्वी आपण लोकेशन, अँप्रोच रोड आजू–बाजु कोणतीही झोपडपट्टी, स्मशानभूमी, सरकारी रिझर्वेशन्स, मिलिटरी एरिया, हा एरिया येत नाही याची खात्री करून घेणे.

**२ फिज़िब्लिटी ऑफ प्रोजेक्ट –** आपण घेत असलेल्या प्लॉटवर अंदाजे किती बांधकाम होत आहे याची खात्री करून घेणे. आपण जे विकणार आहोत त्याचा मार्केट रेट वजा कंन्स्ट्रक्शनला लागणारा खर्च याप्रमाणे आपल्याला फिजिब्लिटी ऑफ प्रोजेक्ट मिळेल.

**३ लीगल चेक –** आपण घेत असलेला प्लॉट याचे सर्व कागदपत्र हे एका तज्ञ वकिलांकडून चेक करून घेणे. आवश्यक कागदपत्र उदाहरणार्थ एन ए ऑर्डर, ७/१२ उतारा, ले आऊट कॉपी, सर्च रिपोर्ट, खरेदी खतचे चैन डॉक्यूमेंट इत्यादी. चेक करणे आवश्यक आहे.

**४ अरेंजमेंट्स ऑफ फंडस् –** कोणताही प्रोजेक्ट चालु करताना आपण कस्टमर कडून पैसे येतील मग काम करू अश्या हेतुने प्रोजेक्ट चालू करणे चुकीचे आहे. आणि आपल्याला कधी–कधी कस्टमर कडून आलेले पैसे दुसऱ्या प्रोजेक्टवर किंवा दुसरीकडे वळवणे (डायव्हर्ट करणे) चुकीचे आहे. आपण प्रोजेक्ट चालू करण्यापूर्वी कन्स्ट्रक्शनला लागणारे ६०% पैसे आपल्याकडे असणे गरजेचे आहे त्याने तुमचे काम बंद पडत नाही किंवा थांबत नाही तसेच काम सातत्याने चालू राहते, त्यामुळे प्रोजेक्ट वेळेत पूर्ण होतो.

**५ प्लॅनिंग ऑफ द प्रोजेक्ट –** आपण घेतलेल्या प्लॉटवर फिज़िब्लिटीनुसार आपण फ्लॅट, बंगलो किंवा कमर्शियल प्रोजेक्ट यापैकी तेथील मार्केट आणि आजूबाजूचा परिसर यानुसार वेगवेगळे करणे गरजेचे आहे. प्लॅनिंग करताना आपल्याला लोकेशन अनुसार जर १ BHK फ्लॅट विकले जात असतील तर १ BHK फ्लॅटचीच स्कीम करावी त्या ठिकाणी जास्त आउटपुट मिळत आहे म्हणून ३ BHK चे किंवा कमर्शियलचा विचार करू नये. प्लॅनिंग हा अत्यंत महत्वाचा भाग असून या ठिकाणी आपण आर्किटेक्ट नेमणे, आर सी सी डिझाइनर, लँड स्केप डिझाइनर फायनल करणे हे अतिशय आवश्यक आहे प्लॅनिंग स्टेजला झालेल्या बदलाचा खर्च खूप कमी असून कंन्स्ट्रक्शन स्टेजला केले गेलेले बदल हे आर्थिकदृष्ट्या व प्रोजेक्ट कालावधीला बाधा पोहोचवणारे असतात. कोणताही प्रोजेक्ट चालू करण्यापूर्वी आर्किटेक्टचे आर सी सी डिझाइनरचे प्लॅन तयार असणे व त्यांच्यावर आपला अभ्यास होणे गरजेचे आहे. आपला प्रोजेक्ट रेरा अंर्तगत येतो आहे का, हे चेक करणे गरजेचे आहे. असेल तर रेरा नं, रेरा बँक अकाउंट हे काढणे आवश्यक आहे. प्रोजेक्टचे मायक्रो एस्टिमेशन करणे व एम इ पी कन्सलटंट (मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि प्लम्बिंग) नेमणे गरजेचे आहे. प्रोजेक्टचा महापालिका नियमावलीतून प्लॅन पास करून घेणे अत्यंत गरजेचे आहे तसेच वास्तू शास्त्राचा विचार करणेदेखील तेवढेच गरजेचे आहे.

**६ एक्झिक्युशन ऑफ प्रोजेक्ट –** प्लॅन फायनल झाल्यावर साईटवर काम चालू करणे साईट इंजिनिअरची नेमणूक करणे. ते काम पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी प्रत्येक कामाची क्वालिटी, कन्स्ट्रक्शन ला लागणारा वेळ याचे वेळापत्रकाप्रमाणे काम करणे. कन्स्ट्रक्शनचे वेळापत्रक हे काम चालू होण्यापूर्वी प्रत्येक गोष्टीला लागणारा वेळ उदाहरणार्थ फुटिंगला लागणारा वेळ, बांधकामाला लागणारा वेळ अश्या विविध गोष्टीचा अंदाज घेऊन एक वेळापत्रक करणे गरजेचे आहे व त्याच प्रमाणे साईटवर काम होत असल्याचे चेक करणे वेळोवेळी गरजेचे आहे.

**७ क्वालिटी चेक –** क्वालिटी चेक हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्यानुसार आपल्याला लागणाऱ्या वस्तु घेण्यापूर्वी तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच बांधकामाची क्वालिटी चेक करण्यासाठी एक पी एम सी (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट) नेमणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एम इ पी कन्सलटंट चे वेळोवेळी लक्ष असणे गरजेचे आहे.

**८ अकौंटिंग ऑफ प्रोजेक्ट –** प्रोजेक्ट चालू झाल्यावर प्रत्येक स्टेजला होणारा खर्च हा मायक्रो एस्टिमेशन पेक्षा जास्त होत आहे का ? याच्या वर लक्ष ठेवणे व वेळोवेळी लागणारे मटेरियल खरेदी करणे व लेबर पेमेंट करणे त्या त्या वेळेस आवश्यक आहे.

**९ ॲडव्हटायझिंग ॲण्ड सेल्स प्रोजेक्ट –** हा फक्त कंन्स्ट्रक्ट करून पूर्ण होत नसतो तर त्याला विकणेही गरजेचे असते. त्याच्यासाठी आवश्यक ते सोशल मीडिया ॲडव्हटायझिंग, उदाहरणार्थ डिजिटल / पेपर / बॅनर हे करणे आवश्यक आहे तसेच आलेला डाटा व कस्टमर प्रॉपर हँडल करून चॅनलाइज्ड करणे गरजेचे आहे. प्रोजेक्टच्या गरजेप्रमाणे कधी कधी ब्रोकर नेमणे व त्याला कमिशन देणे गरजेचे असू शकते.

**१० कस्टमर हँडलिंग –** ॲडव्हटायझिंग मध्ये मिळालेल्या डाटा प्रमाणे कस्टमरची साईट व्हिझिट करून घेणे, आवश्यक ते फ्लॅट, बंगलो किंवा कमर्शियल स्पेस दाखवणे, त्यात काही बदल अपेक्षित असतील आणि ते शक्य असेल तर चेंज करून देणे, कस्टमरला बँक लोन करण्यासाठी आवश्यक ते डॉक्यूमेंट्स किंवा लागणारी मदत करणे.

**११ गुड डिलिव्हरी ऑफ प्रोजेक्ट –** प्रोजेक्ट कम्प्लिट झाल्यावर कस्टमर सॅटिसफॅक्शन होणे गरजेचे आहे. हॅप्पी कस्टमर विल गिव्ह यु न्यू कस्टमर. हे धोरण ठेऊन प्रोजेक्ट कम्प्लिट झाल्यावर काही अडचणी आल्यास ते सॉल्व्ह करून देणे गरजेचे आहे तसेच बिल्डिंग मेन्टेन ठेवणे पण तितकेच गरजेचे आहे.

अरे बापरे, एका बिल्डरला एवढ बघावं लागत. आपण तर विचार करतो की बिल्डरला खुप प्रॉफिट होतो. पण त्या मागे त्यांची लागणारी मेहनत व पैसा आपल्याला दिसत नाही.

चांगला बिल्डर हा नेहमी मार्केटप्रमाणे फ्लॅटचा रेट ठरवत असतो, तरीही तुलना करताना आपण लोकेशन, कन्स्ट्रक्शन, क्वालिटी, बिल्डर ट्रॅक हे बघणे आवश्यक आहे. तसेच काम चालू होत असताना आपण जर फ्लॅट बुक केला तर बऱ्याच वेळा इंटर्नल चेंजेस आपल्या गरजेप्रमाणे बिल्डर आपल्याला करून देऊ शकतात या काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

तर आजपासून एक ब्रीद वाक्य ठरवू या !

**वन गुड बिल्डर विल प्रोव्हाइड अस अ ब्युटीफुल स्वीट होम ॲण्ड हॅप्पी कस्टमर विल प्रोव्हाइड न्यू कस्टमर, ॲण्ड इट विल एन्करेज अस फॉर न्यू प्रोजेक्ट**

**'प्रत्येक बिल्डर हा चोर नसतो'**

**बिल्डर हा आपल्या जीवनातील एक आधार स्तंभ आहे, कारण तो आपल्याला जीवनावश्यक गरजा पैकी एक महत्वाची गरज म्हणजेच ' निवारा' देण्याचा काम बिल्डर करत असतो.**

या सगळ्या गोष्टी आपण लक्षात घेऊन जर त्याची योग्य अंमलबजावणी केली तर बिल्डरशिप हे नक्कीच एक वरदान ठरु शकेल अन्यथा तो एक अभिशाप ठरेल.



**इंजिनिअर – अभिजीत दिनेश देवी**
**(AES Secretary)**
**BE Civil (MI T Pune).** फर्म **A to Z Construction**
**Off. Add.** – पहिला मजला हॉटेल गुलमोहोर प्राइड, सुरभी हॉस्पिटलसमोर, सावेडी, अहिल्यानगर.
**Mobile No. 9921031838**
**Email ID - abhidevi85@gmail.com, atozconstuction22gmail.com**
**Web: https://atozconstructions.co.in/**

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

## विवेकानंद इलेक्ट्रोपॅथी महाविद्यालयाचा ९९% निकाल

नगर – भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे अधिकृत व सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार प्रॅक्टीस व शिक्षण घेण्यासाठी मान्यता प्राप्त साडेचार वर्षीय रेग्युलर इलेक्ट्रोपॅथी पदवी अभ्यासक्रम चालविणारे विवेकानंद मेडिकल कॉलेज ऑफ इलेक्ट्रोपॅथी अहमदनगर या महाविद्यालयाचा वर्ष २०२४ ते २०२५ या शैक्षणिक वर्षाचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे.

प्रथम वर्षात : साक्षी सुनिल पाटील हिने ७२% गुणासह प्रथम क्रमांक पटकविला व कीर्ती सुनिल पाटील हिने ६८% गुणांनी द्वितीय क्रमांक पटकविला.

द्वितीय वर्षात : एम डी फजल हाक्यु याने ७२% गुणासह प्रथम क्रमांक पटकविला व ऋतुजा भिवरनाथ पारे हिने ७०% गुणांनी द्वितीय क्रमांक पटकविला.


तृतीय वर्षात : आविनाश भास्कर शिंदे ७६% गुणासह प्रथम क्रमांक पटकविला व प्रसद जालिंदर पऱ्हे याने ७६% गुणासह प्रथम क्रमांक पटकविला व शेख एत्तेशाम आरिफ याने ७५ % गुणांनी द्वितीय क्रमांक पटकविला.

चतुर्थ वर्षात : गीतांजली भरत रोखले हिने ८१ % गुणासह प्रथम क्रमांक पटकविला व श्रद्धा गोरक्षनाथ तोडमल हिने ७४% गुणासह द्वितीय क्रमांक पटकविला.

प्रथम वर्षात : M.D. प्रथम वर्षात बेग हामेद नासेर याने ६४% गुणांनी प्रथम क्रमांक पटकविला.

प्राचार्य डॉ.एम.एस. आहिरे यांच्या हस्ते उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचा अधिकृत आभ्यासक्रम शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या २० बॅच प्रत्यक्ष प्रॅक्टीसमध्ये कार्यरत आहेत व संपूर्ण भारतात २९ बॅच प्रॅक्टीसमध्ये कार्यरत आहेत.

## अय्यप्पा मंदिराचा १० जूनला प्रतीस्थापना महोत्सव



नगर – सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा ३१ वा प्रतीस्थापना महोत्सव (वर्धापनदिन) १० जून रोजी साजरा होत असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार्याच्या उपस्थिती करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली

श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास ३० वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिनानिमीत पहाटे पासूनच विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे. यामध्ये महागणपती हवन, उषा पूजा, महामृत्युंजय हवन, कलश पूजा, कलश अभिषेकम, उच्च पूजा तर संध्याकाळी भगवती सेवा, पुष्पा अभिषेक, अथर्झापूजा, हरी वरासम होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे. सर्व कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहावे तसेच श्री आयप्पा सेवा समितीच्या कलश पुजेस ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी व अन्नदानासाठी मंदिरात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रमोद मुळे- सामाजिक कार्यातील ७५ वर्षांचा युवक

''मै उस प्रभू का सेवक हूं
जिसे लोक मनुष्य कहते है''

ही स्वामी विवेकानंदांची विचारांची प्रेरणा घेऊन सामाजिक कार्य सुरू केलेले ७५ वर्षांचे युवक म्हणजे भिंगारचे एक सद्गुणी व्यक्तिमत्व प्रमोद मुळे.

विद्वत्ता, स्वार्थत्याग, सेवापरायणता, नम्रता हे गुण प्रमोदजींनी अंगी बाळगले. परिणामी मोठा जनसंपर्क निर्माण झाला. यातून चांगल्या मित्रांना एकत्रित करून भिंगार येथे १९९६ साली स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीची स्थापना केली. या माध्यमातून त्यांची सामाजिक कार्यास सुरुवात झाली. जनसेवा हीच ईश्वर सेवा मानली.

स्वामी विवेकानंदांच्या विचाराने प्रभावित होऊन केवळ सामाजिक कार्यासाठी प्रमोद मुळे यांनी पाच वर्ष अगोदरच शासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली.यातून त्यांच्या समाजसेवेची तळमळ दिसून येते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेल्या प्रमोदजींना लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड होती. सन १९६८ पासून भिंगार विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून काम करताना अनेक धडे घेतले.तेव्हापासून त्यांचे कार्य अखंडपणे चालूच आहे. त्यांचे विविध राजकीय सामाजिक कार्यकर्ते संघटनांशी आपुलकीचे संबंध आहेत.

स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीचे अनेक वर्षांपासून ते अध्यक्ष आहेत. या संस्थेच्यावतीने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त २५ वर्षांपासून विवेकानंद व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. विविध विषयांवरील सुमारे शंभर वक्त्यांनी आतापर्यंत मार्गदर्शन केले. जागतिक महिलादिनी दरवर्षी प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित केले जाते. हिमोग्लोबिन तपासणी व मार्गदर्शन केले जाते. आतापर्यंत शेकडो महिलांनी यात सहभाग नोंदविला.काळाची गरज ओळखून त्यांनी संस्थेच्या माध्यमातून रक्तदान शिबीर सुरु केले.आजपर्यंतच्या २३ रक्तदान शिबिरातून २८०२ इतक्या रक्तदात्यांनी रक्तदान केले. कोरोनाच्या प्रारंभी रक्ताचा तुटवडा जाणवत होता. याची माहिती मिळताच त्यांनी भिंगार मधील १४६ रक्तदात्यांना कळवून जनकल्याण रक्तपेढीत रक्तदान करुन घेतले.तसेच आजवर भिंगार व परिसरातील अनेक रुग्णांना रक्त पिशव्या मिळण्यासाठी सहकार्य केले. शिक्षणापासून गरजू गरीब विद्यार्थी वंचित राहू नये. यासाठी संस्थेने गणवेश व एस.एस.सी.बोर्ड परीक्षा



फी साठी तीन लाख रुपयांपेक्षा जास्त आर्थिक साहाय्य केले. अशा प्रकारे विविध उपक्रम राबवून ते जनसेवेचे कार्य करत असतात. प्रबोधिनीच्या २९ वर्षांच्या सेवा कार्यात आजी–माजी पदाधिकारी संचालक, सभासद यांच्या सहकार्याचा मोठा वाटा आहे.

नगरमधील जनकल्याण रक्तपेढीचे ते २००४ ते २०१९ पर्यंत संचालक होते. याकाळात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. याप्रसंगी डॉ.रवींद्र साताळकर व डॉ. दिलीप धनेश्वर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. जनकल्याण रक्तपेढीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष प्रमोद मुळे व स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीला रक्तदान चळवळ व उत्कृष्ट शिबिराचे आयोजनाबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

शासकीय सेवेत असताना आपल्या कार्याचा आदर्श घालून दिला. शासनाच्या मान्यताप्राप्त रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र प्रांतचे १८वर्ष अतिरिक्त सरचिटणीस व पाच वर्ष सरचिटणीस असताना दीर्घकाळ प्रलंबित, सुधारित वेतनश्रेणीच्या प्रश्नांची सोडवणूक केली. कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये हक्काबरोबरच कर्तव्याची भावना रुजवली.कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांना शासनाकडून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. त्याच्या चांगल्या कामामुळे शासनाकडून दोन वेळा आगाऊ वेतनवाढ मिळाली.

नगरच्या पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी सहकारी पतसंस्थेत संचालक,व्हाईस चेअरमन, चेअरमन पदावर असताना कामात शिस्त आणली.पतसंस्था प्रगतीपथावर नेली. आदर्श पोटनियम, सहकार कायद्याचा अभ्यास करुन कर्मचाऱ्यांना सुलभ कर्ज मिळण्यासाठी केलेल्या विविध उपाययोजना उपयुक्त ठरल्या. त्यांच्या कार्याचा उल्लेख पतसंस्थेत आवर्जून केला जातो.

भारतीय मजदुर संघ, विशेष कार्यकारी अधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नगरच्या महिला व बालकल्याण संरक्षण समितीवर ते काही काळ कार्यरत होते. येथे आपल्या कामाचा ठसा उमटवला.सर्वांना सोबत घेऊन कार्य करणे ही त्यांची खासियत. सततच्या लोकसंपर्कमुळे व्यक्तिगत जीवनात मोठा लोकसंग्रह निर्माण झाला. युवकांचे ते आदर्श बनले.अनेक युवक सामाजिक कार्यासाठी सहभागी होवू लागले. तेजस्विता, तपस्वीता आणि तत्परता या तीन गुणांच्या आचरणामुळे युवकांच्या गराड्यात सामाजिक कार्य करताना ते आपल्या अमृतमहोत्सवी वर्षात सुद्धा युवकच बनलेत.

प्रमोद मुळे यांना घरातूनच संघ संस्कार मिळाल्याने ते वयाच्या ७ व्या वर्षी भिंगारच्या रोकडेश्वर शाखेत जावू लागले. पुढे मुख्य शिक्षक व कार्यवाह झाले. संघसंस्कारातून त्यांना जीवनाची दिशा मिळाली. त्यांचे घर म्हणजे संघ प्रचारकांचे निवासस्थान बनले. अनेक प्रचारकांचा सहवास व मार्गदर्शन लाभले. आणीबाणीच्या काळात घरोघरी पत्रके वाटून जनजागृतीचे काम केले. यात जागृती यात्रा महत्त्वाची ठरली.

रामजन्मभूमी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. जय श्रीरामचा नारा देत भिंगार व परिसरात ४० ठिकाणी शिलापूजनाचे कार्यक्रम केले. तत्कालिन प्रांत प्रचारक दामूआण्णा दाते आणि क्षेत्रीय संघचालक ज्येष्ठ विधिज्ञ माणिकराव पाटील यांचा सहवास व मार्गदर्शन मिळाले. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्यापासून ते सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रत्यक्ष विचार ऐकण्याची संधी मिळाली. सामाजिक समरसताचा विचार करता स्वतः आंतरजातीय विवाह केला. तर मुलीचा देखील आंतरजातीय विवाह केला.

एक शिस्तप्रिय व सद्गुणी व्यक्ती म्हणुनच प्रमोद मुळे यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी सर्वस्तरातील युवकांना सोबत घेतले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्यांना सामाजिक कार्याची दिशा दाखविण्याचे बहुमोल कार्य ते करीत आहेत. ते १० जुन रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. या ध्येयनिष्ठ समाजसेवकास अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा. त्यांना दीर्घायुष्य लाभो !!

**– संजय बबन शिंदे,**
मुख्याध्यापक, छावनी परिषद शाळा भिंगार



साईबन व दिशान ॲडस् आयोजित निबंध स्पर्धेत फैजान मिर्झा, सार्थक बंग, प्राची नवले यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

## साईबन व दिशान ॲडस् आयोजित निबंध स्पर्धेत फैजान मिर्झा, सार्थक बंग, प्राची नवले प्रथम

नगर – साईबन व दिशान ॲडस् आयोजित निबंध स्पर्धेत फैजान मिर्झा, सार्थक बंग, प्राची नवले यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

पर्यावरणदिनाच्या दिनी स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ झाला. कार्यक्रमांच्या प्रारंभी डॉ. सुधा कांकरिया यांनी पर्यावरणासंबंधी सर्वांना शपथ देऊन निसर्ग प्रेमाविषयी कटिबध्दता ठेवण्याचे आवाहन केले. तर डॉ. प्रकाश कांकरिया यांनी निसर्गाच्या प्रेमापोटीच एम.आय.डी.सी. येथे खडकाळ बंजर जमिनीवर हळूहळू प्रयत्नपूर्वक साईबन हे भव्य हिरव स्वप्न साकारल्याचे विस्तृतपणे विशद केले.

परीक्षक सतीश डेरेकर यांनी निबंध स्पर्धेचे परीक्षण कसे केले हे सांगतांना नेहमी लिहीत रहा असे स्पर्धकांना सांगितले.

मुख्य अतिथी भूषण देशमुख यांनी आपल्या नगरीच्या ५०० वर्षाची महत्त्वपूर्ण माहिती देतांना निसर्गदृष्ट्या आपले शहर निर्सगसुंदर व जगातले कैरो बगदाद नंतर सुंदर शहर होते. येथे मोठ मोठ्या बागा कारंजे होती. मोठी बाजारपेठ होती व आज अहिल्यानगर नाव असणाऱ्या अहिल्याबाईंनी पाणी व्यवस्थापन, मंदिरे व समाज जिर्णोध्दाराची मोठी कामे केल्याची सांगितले.

स्वागत व सूत्रसंचालन किशोर गांधी यांनी केले. स्पर्धेत संगमनेरचे ७८ वर्षीय सुभाष थोरात व ८२ वर्षीय सप्तर्षी सरांना विशेष उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. बबीता गांधी यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – गट क्र. ४ ते ८ – फैजान मतीन मिर्झा (प्रथम), सोहम नितीन चोपडा (द्वितीय), अविनाश देवदत्त पवार (तृतीय), अस्मि अमोल सप्तर्षी – (उत्तेजनार्थ)

८ वी ते १२ वी – सार्थक गोपाल बंग – (प्रथम), उत्कर्ष नितीन शेटीया –(द्वितीय), श्रुती संतोष घंगाळे – (तृतीय), प्रियंका किशोर परदेशी – (उत्तेजनार्थ)

खुला गट – प्राची शैलेंद्र नवले (प्रथम), रेखा विनोद चुत्तर (द्वितीय), स्नेहल छाजेड (तृतीय), सिमरन प्रमोद मुनोत – (उत्तेजनार्थ) विजेत्यांना रोख बक्षिसे व सर्व स्पर्धकांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

# निरामय

## गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको



दुखापत
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

खेळताना गुडघा वेडावाकडा वाकल्यास किंवा त्याला अचानक मार बसल्यास गुडघ्याच्या दुखापती होतात. गुडघा हा शरीरातील सर्वात महत्त्वाच्या सांध्यांपैकी एक आहे. चालण्यास, धावण्यास, उडी मारण्यास, खाली बसण्यास तसेच उठून उभं राहण्यास गुडघे मदत करतात.

गुडघ्यांच्या आत धाग्यांसारख्या काही ऊती असतात. त्या सांधा मजबूतीने एकत्र जोडून ठेवण्यास मदत करतात. त्यांना अस्थिबंधन (लिगामेंट्स) म्हणतात. हे अस्थिबंधन गुडघ्यांचे सांधे स्थिर राखण्यात मदत करतात. कधीकधी अचानक पडणं, पाय मुरगळणं, गुडघा वाकणं किंवा खेळाच्या दुखापतीमुळे अस्थिबंधनावर ताण येऊ शकतो किंवा ते फाटू शकतात. याला गुडघ्याच्या अस्थिबंधनाची दुखापत असं म्हणतात. या दुखापती व्यायाम करणाऱ्या, मैदानी खेळ खेळणाऱ्या आणि धावताना अचानक दिशा बदलणाऱ्या व्यक्तींमध्ये अधिक सामान्य आहेत.

**उपचार न घेतल्यास दीर्घकालीन समस्या**

गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतींमुळे तीव्र वेदना, सूज आणि हालचालींवर मर्यादा येऊ शकतात. याकडे दुर्लक्ष केल्यास किंवा उपचार न केल्यास गुडघ्याचे सांधे कमकुवत होऊन दीर्घकालीन समस्यांना आमंत्रण मिळू शकतं. योग्य काळजी आणि विश्रांती घेतल्यास या दुखापती बऱ्या होऊ शकतात आणि भविष्यातील समस्यादेखील टाळता येतात.

**गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतींचे प्रकार**

* **एसीएल दुखापत (अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट):** हा गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतीचा सर्वात सामान्य प्रकार आहे. फुटबॉल, बास्केटबॉल किंवा जिम्नॅस्टिक्ससारखे खेळताना या प्रकारची दुखापत होऊ शकते. अचानक थांबताना, उडी मारताना अनाठायीपणे उतरताना किंवा अचानक दिशा बदलतानाही ती होऊ शकते. अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट इजा (एसीएल) झाली असेल तर रुग्णामध्ये तीव्र वेदना, दुखापतीनंतर लगेच सूज येणं, वजन सहन न होणं आणि सांधे कडक होणं अशी लक्षणे दिसून येतात.


* **पीसीएल दुखापत (पोस्टेरियर क्रूशिएट लिगामेंट):** गुडघ्यामध्ये या विशिष्ट प्रकारच्या अस्थिबंधनाच्या दुखापती गुडघ्याच्या पुढच्या बाजूला असलेल्या जोरदार आघातामुळे होतात. पोस्टरियर क्रूसिएट लिगामेंट दुखापतीमुळे लगेचच तीक्ष्ण वेदना होत नाहीत; परंतु कालांतराने परिस्थिती आणखी बिकट होऊन चालण्यास त्रास होऊ शकतो

* **एमसीएल (मेडियल कोलॅटरल लिगामेंट) :** दुखापत झाल्यावर गुडघा एका बाजूला खूप वाकतो. गुडघे सरळ ठेवणं किंवा वाकवणंदेखील कठीण होऊ शकतं. गुडघ्याच्या आतील बाजूस जास्त दाब पडल्याने बाहेरील भागावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एलसीएल (लॅटरल कोलॅटरल लिगामेंट) दुखापत होऊ शकते. प्रभावित भाग सुजू शकतो आणि चालताना किंवा गुडघे वाकवताना त्रास होऊ शकतो.

**काय करावं?**

गुडघ्याची स्थिरता पुनर्संचयित करण्यासाठी आणि हालचालींची श्रेणी सुधारण्यासाठी रुग्णाला आर्थ्रोस्कोपिक पद्धतीने अस्थिबंधन दुरुस्तीचा सल्ला दिला जातो. ही 'मिनिमली इन्वेजिव्ह' शस्त्रक्रिया आहे. सांध्यातील दुरुस्तीचे मार्गदर्शन करण्यासाठी विविध उपकरणं वापरली जातात. ही उपकरणं आणि कॅमेराच्या मदतीने फाटलेले किंवा खराब झालेले अस्थिबंधन दुरुस्त केले जातात.

## अकाली रजोनिवृत्तीचं व्यवस्थापन



जीवनशैली
डॉ. मेघा दळे

आजकाल महिलांना ऑफिसच्या ताण-तणावामुळे आणि घरातील कामांमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या वाढू लागल्या आहेत. त्यातही महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. रजोनिवृत्तीच्या वेळी होणारा त्रास ही एक गंभीर समस्या बनली आहे. शक्यतो ४५ ते ५५ या वयात रजोनिवृत्ती येते; परंतु चुकीची जीवनशैली आणि इतर काही कारणांमुळे काही महिला ३० ते ४० या वयातच या अवस्थेतून जात आहेत. याचा महिलांवर केवळ शारीरिकच नाही, तर मानसिक आणि भावनिकदृष्ट्याही खोलवर परिणाम होतो.

कोणत्याही महिलेला अशी लक्षणे जाणवत असतील, तर ती हलक्यात घेऊ नका. कुटुंबातील महिलांना आधीच वेळेपूर्वीच रजोनिवृत्ती आली असेल तर त्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. वेळेवर निदान, योग्य उपचार आणि काळजी घेतल्यास गुंतागुंत टाळता येते. रजोनिवृत्ती वेळेपूर्वी येण्यासाठी खालील कारणं कारणीभूत ठरतात.

* **आरोग्य समस्या:** थायरॉईड, ऑटोइम्यून डिसऑर्डर.
* **जीवनशैली:** ताणतणाव, खाण्याच्या वाईट सवयी, जास्त धूम्रपान किंवा मद्यपान.
* **शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय कारणं:** अंडाशय किंवा गर्भाशयावर शस्त्रक्रिया, केमोथेरपी.
* **लहान वयात रजोनिवृत्तीची लक्षणं:** मासिक पाळी अनियमित होते किंवा अचानक थांबते. उष्णता आणि घाम येणं.
* **निद्रानाश किंवा झोपेचा अभाव:** मूड स्विंग्स, चिडचिडेपणा आणि नैराश्य. शरीरात थकवा आणि अशक्तपणा जाणवणं. त्वचा कोरडी पडणं आणि केस गळणं. लैंगिक इच्छा कमी होणं आणि वेदनादायक संभोग.

**काय काळजी घ्यावी?**

* **निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा:** संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि तणाव कमी करणं आवश्यक आहे.
* **वैद्यकीय सल्ला घ्या:** हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीची आवश्यकता असू शकते.
* **नियमित तपासणी:** हार्मोन्सची पातळी तपासा आणि हाडांकडे लक्ष द्या.
* **मानसिक आरोग्य काळजी:** ध्यान, योग आणि विश्रांती या तीन बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत.

लहान वयात रजोनिवृत्ती येणें ही गंभीर बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करणं आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकतं.

## उच्च रक्तदाब धोकादायकच




व्याधीविकार
डॉ. दत्तात्रय मुळे

उच्च रक्तदाबामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळू शकतं. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीचा आहार यामुळे कमी वयातच हा विकार जडू लागला आहे. तसं पाहिलं तर उच्च रक्तदाब हा आजार नाही; परंतु उच्च रक्तदाबामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात आणि ते प्राणघातक ठरु शकतात.

उच्च रक्तदाब ही आधुनिक जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे उद्भवणारी आरोग्य समस्या आहे. हल्लीच्या काळात उच्च रक्तदाबाचे अगदी विशीतले रुग्णही आढळून येत आहेत. काही प्रकरणांमध्ये तर १४-१५ वर्षे वयोगटातील मुलांमध्येही उच्च रक्तदाब दिसून येतो. जास्त चरबीयुक्त आहार आणि कमी शारीरिक हालचाल ही याची मुख्य कारणं आहेत. रक्तदाब जास्त असतो, तेव्हा सुरुवातीला फार गंभीर लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे ते गांभीर्याने घेतलं जात नाही.

शरीराचं मोठं नुकसान काही काळानंतर उच्च रक्तदाब गंभीर बनतो आणि शरीराला मोठं नुकसान पोहोचवू शकतो. सतत वाढणारा रक्तदाब हृदयविकार आणि स्ट्रोक या दोन घातक आजारांना कारणीभूत ठरतो. दोन्ही विकारांमध्ये वेळेवर उपचार मिळाले नाहीत, तर रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. हृदयविकाराच्या झटक्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलतं. रुग्णाला आयुष्यभर संतुलित आहार घ्यावा लागतो आणि स्ट्रोक (मेंदूतील रक्तस्राव) झाल्यास, कधीकधी रुग्ण चालण्याच्या स्थितीतही नसतो.

## का मंदावते रोगप्रतिकारशक्ती?



वेगळं काही


अनेकजण आरोग्याबाबत खूप दक्ष असतात. काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुतात. पोषक आहाराचं आणि जीवनसत्त्वयुक्त गोळ्यांचं नियमित सेवन करतात. आजारी माणसांपासून शक्य तितकं लांब रहातात. स्वतःची प्रत्येक वस्तू बॅक्टेरियामुक्त असेल याची काळजी घेतात. मात्र एवढं करूनही सर्दी, खोकला, तापाचे जंतू त्यांच्या शरीरात प्रवेश करण्यात यशस्वी ठरतात. एवढी काळजी घेऊनही आपण का आजारी पडलो, असा प्रश्न डॉक्टरांना विचारला जातो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होण्यामागे काही वेगळी कारणंही असू शकतात. याच कारणांचा उहापोह करण्याचा हा प्रयत्न...

सध्या वायू प्रदूषणाचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. हे प्रदूषण फक्त फुफ्फुसांवरच आघात करतं असं नाही तर रोगप्रतिकारक शक्तीही कमी करतं. प्रदूषित हवा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या 'टी' पेशींवर प्रभाव टाकते. त्यामुळे बराच काळ प्रदूषित वातावरणात घालवल्यानंतर आजारपण येऊ शकतं. वातावरणातला हवेचा दर्जा सुधारणं शक्य नसलं तरी चांगला एअर प्युरिफायर आणि चांगला फेस मास्क विकत घेता येईल.

प्रथिनांच्या अतिसेवनामुळेही रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या प्रथिनांमुळे शरीरात 'वन जीएफ वन' हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोनमुळे वय वाढण्याची प्रक्रिया वेगवान होते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे दुग्धजन्य उत्पादनं, मांस अशा प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या कॅलरींचं प्रमाण तुम्ही घेत असलेल्या दैनंदिन कॅलरींच्या तुलनेत दहा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, याची काळजी घ्या. यानंतरही त्रास सुरू राहिला तर प्राणीजन्य पदार्थांमधून घेतल्या जाणाऱ्या कॅलरींचं प्रमाण पाच टक्क्यांवर आणा.

एकाकी आयुष्य जगणाऱ्या लोकांवर अधिक ताण येतो. याच कारणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होते. म्हणूनच एकटेपणा टाळण्यासाठी प्रयत्न करावा. कुटुंबिय, मित्रमंडळी, सहकारी यांच्यासह अधिकाधिक वेळ घालवण्याचा प्रयत्न करावा. सर्वांमध्ये मिळून-मिसळून रहाणारे रोगांचा अधिक चांगल्या प्रकारे सामना करू शकतात.

## तरुणांनाही सतावतेय केसगळती



केसांचं आरोग्य
डॉ. दीप्ती नेने

आजकाल केस गळतीची समस्या गंभीर बनली आहे. बदललेली जीवनशैली, ताणतणाव आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे लोकांच्या डोक्यावरील केस गळत आहेत.

केसगळतीच्या समस्येने ग्रस्त असलेले तरुण केस प्रत्यारोपण करून घेत आहेत. काही आजार आणि पोषणाच्या कमतरतेमुळेदेखील केसगळती होऊ शकते. केसगळतीमागे पोषणाचा अभाव हे कारणही असू शकतं. केसगळतीवर केस प्रत्यारोपणाच्या पर्यायाचा असलंब केला जातो. ही प्रक्रिया खर्चिक तर आहेच, पण तज्ज्ञ व्यक्तकडून करून न घेतल्यास ती जीवघेणीही ठरू शकते.

**केस का गळतात?**

आजारांव्यतिरिक्त केस गळतीची समस्या पोषणाच्या कमतरतेमुळे उद्भवते. पोषणाचा अभाव पूरक आहारांद्वारे भरून काढता योतो. एखाद्या आजारामुळे केसगळती होत असेल तर चांगल्या डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. आपल्या शरीरात काही जीवनसत्त्वांची कमतरता असू शकते. त्यामुळे केस अकाली गळू लागतात. ड, ब ७, ई या जीवनसत्वांच्या तसंच झिंक आणि लोहाच्या कमतरतेमुळे केस गळतात. केसांच्या आरोग्यासाठी हे घटक आवश्यक असतात. याशिवाय काही आजारांमुळे केस गळू लागतात. विविध तपासण्यांनंतर केस गळतीची मुख्य कारणं ठरवली जातात. जीवनसत्त्वं आणि इतर घटकांची कमतरता लवकर दूर होऊ शकते. केस वेगाने गळत असतील आणि कोणताही आजार नसेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. शरीरातील पोषक तत्वांची कमतरता ओळखून, डॉक्टर तुम्हाला योग्य पूरक आहार सुचवू शकतात.

## तक्रारी दुर करणारं त्रिफळा



आयुर्वेद आणि विकार

आपण त्रिफळा हे नाव बरेचदा ऐकलं आहे. त्रिफळा म्हणजे आवळा, हरीतकी आणि विभितिका या तीन फळांचं मिश्रण. हरीतकी या फळात विविध आजार बरे करण्याची क्षमता आहे. त्यातले अँटिऑक्सिडंट्स खूप प्रभावी असतात.

विभितिका हे सुद्धा एक फळ आहे. यात बॅक्टेरिया आणि फंगसविरोधी गुणधर्म असतात. दाह कमी करण्याच्या गुणधम मुळे विभितिका विविध विकारांवर प्रभावी ठरतं. आवळा खूप गुणकारी आहे. यात 'क' जीवनसत्त्व असतं. आवळ्याच्या सेवनाने शरीरातली उष्णता कमी होते. यासोबतच रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. तीन अत्यंत गुणकारी फळांपासून बनलेलं त्रिफळा चूर्ण विविध विकारांवर प्रभावी ठरतं. यातलं 'क' जीवनसत्त्व, अँटीऑक्सिडंट्स तसंच इतर घटकांमुळे केस आणि त्वचेचं आरोग्य सुधारतं. त्रिफळाच्या नियमित वापरामुळे केसांची मुळं बळकट होतात.

केस आणि त्वचेशी संबंधित समस्या असतील तर त्रिफळाचा नियमित वापर करता येईल. त्रिफळामुळे केस गळणं कमी होतं आणि केस छान वाढू लागतात. त्रिफळायुक्त टॉनिक्समुळे कोंड्याचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. तसंच केसांच्या इतर तक्रारीही दूर होतात. त्रिफळामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स राखला जातो. परिणामी केस मजबूत होतात.

## कोलेस्टेरॉल वेळीच ओळखा



आराग्यचर्चा
डॉ. कुंदन गायकवाड

कोलेस्टेरॉलबद्दल बरेच समज-गैरसमज पाहायला मिळतात. ते वाईटच असतं हा ही एक गैरसमजच. शरीरासाठी कोलेस्टेरॉलदेखील आवश्यक आहे. कोलेस्टेरॉलचे दोन प्रकार असतात. एक चांगला आणि दुसरा वाईट. जर वाईट कोलेस्टेरॉल वाढलं, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

**लक्षणं कोणती?**

चांगलं कोलेस्टेरॉल वाईट कोलेस्टेरॉलला नियंत्रित करतं. म्हणून शरीरात चांगल्या कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. चांगलं कोलेस्टेरॉल अधिक असेपर्यंत वाईट कोलेस्टेरॉल फार नुकसान करत नाही. वाईट कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर काही बदल दिसून येतात. यामध्ये त्वचेवर पिवळे किंवा पांढरे डाग पडणं, त्वचेचा रंग बदलणं आणि डोळ्यांभोवती गाठी येणं यासारखी लक्षणं असू शकतात. याशिवाय त्वचेवर इतर अनेक ठिकाणीही गाठी दिसू शकतात. उपचारानंतर गाठी कमी होत जातात. कोलेस्टेरॉल वाढतं तेव्हा डोळे, कोपर, गुडघे किंवा टाचांभोवती पिवळे किंवा पांढरे डाग पडतात किंवा गाठी तयार होऊ शकतात. त्वचेवर लाल पुरळ येऊन खाज सुटते. पापण्या आणि त्वचेवर मेणासारखे पिवळे-केशरी रंगाचे डाग दिसू शकतात.

**लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**

ही लक्षणं जाणवल्यास ताबडतोब कोलेस्टेरॉलची पातळी तपासायला हवी. दिनक्रम आणि आहारात याग्य बदल करायला हवा.

## आहार मधुमेहींचा



आहारतंत्र

मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य आणि पोषक आहार घेणं गरजेचं असतं. रक्तातली साखरेची पातळी वाढू नये यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.


मधुमेहींनी तळलेल्या पदार्थांऐवजी भाजलेल्या किंवा बेक केलेल्या पदार्थांची निवड करावी. तळकट पदार्थांमध्ये कॅलरी आणि मेदाचं प्रमाण अधिक असतं तर भाजलेल्या पदार्थांमधली पोषकमूल्यं टिकून रहातात.

मधुमेहींनी फळांचे रस पिण्याऐवजी फळ खाण्याला प्राधान्य द्यायला हवं. मधुमेहींना मर्यादित प्रमाणात फळं खाता येतील. तसंच ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणारी फळं खाणं अधिक आरोग्यदायी ठरतं.

फळांच्या रसात फायबर नसतं. तसंच रस काढण्यासाठी अधिक फळांचा वापर झाल्याने साखरेचं प्रमाण वाढतं. मात्र फळामधून आवश्यक ते पोषक घटक मिळू शकतात. वेफर्स, बिस्किटांऐवजी बदाम, आक्रोड, पिस्ता, शेंगदाणे खाता येतील. यातल्या पोषक घटकांमुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहील.

नवसंशोधन


### फायबरमुळे कॅन्सरला प्रतिबंध!



आहारातल्या तंतूमय पदार्थांचं म्हणजे फायबरचं महत्त्व आपण जाणतोच. फायबरमुळे पचनशक्ती सुधारते. रक्तातलं कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यातही फायबर महत्त्वाची भूमिका बजावतं. मधुमेहींच्या आहारात फायबरचा समावेश असणं गरजेचं असतं. फायबरमुळे हे लाभ होतातच. शिवाय फुफ्फुसाच्या कर्करोगाची शक्यता अनेकपटींनी घटत असल्याची बाबही एका संशोधनातून समोर आली आहे. वॅंडरबिल्ट विद्यापीठातल्या संशोधकांनी यावर प्रकाश टाकला आहे. जामा ऑन्कोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. या संशोधनाच्या निष्कर्षासाठी अमेरिका, युरोप आणि आशिया खंडातल्या सुमारे १.४ दशलक्ष प्रौढांचा अभ्यास करण्यात आला.

दंतारोग्य


### एनॅमलचा थर टिकवण्यासाठी...




दातांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची संख्या कमी नाही. पण दातांकडे झालेलं दुर्लक्ष तुम्हाला चांगलंच महागात पडू शकतं. नियमित दात घासल्यानंतरही त्यावरचा एनॅमलचा थर नष्ट होण्याचा धोका असतो. गोड पदार्थ आणि आहारातल्या कर्बोदकांमुळे हा थर कमी होत जातो. गोड पदार्थ आणि कर्बोदकांमुळे आपल्या लाळेत आम्लाचं प्रमाण वाढतं आणि हे आम्ल दातांवरचं एनॅमलचं प्रमाण कमी करतं. एनॅमल कमी झाल्यामुळे आपले दात संवेदनशील होतात. थंड किंवा गरम पदार्थांचं सेवन केल्यानंतर झिणझिण्या जाणवतात. दातांची झीज, पिवळेपणा अशा समस्यांना सामोरं जावं लागतं. हे टाळण्यासाठी खाल्ल्यानंतर खळखळून चूळ भरायला हवी. यासोबतच फ्लोराइडयुक्त टूथपेस्ट तसंच माउथवॉशचा वापर करायला हवा.

काळजी त्वचेची

### ब्लीच करताय?



बऱ्याच महिला नियमित ब्लीच करतात. बरेचदा घरच्या घरी ब्लीच केलं जातं. ब्लीचमुळे चेहऱ्यावरची लव झाकली जाते. शिवाय त्वचेचा रंग उजळतो. मात्र घरीच ब्लीच करणाऱ्यांनी अधिक काळजी घ्यायला हवी. बाजारात अनेक कंपन्यांची ब्लीच मिळतात. आपल्या त्वचेला साजेशा ब्लीचची निवड करा. महत्त्वाची बाब म्हणजे ब्लीच हातांऐवजी ब्रशने लावा. ब्लीच चेहऱ्यावर १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेऊ नका. वाळलेले ब्लीच टिश्यू पेपर किंवा कापसाने काढून टाका. यानंतर ब्लीच केल्यानंतर लावायच्या क्रीमने चेहऱ्याला मसाज करा. ब्लीच १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेवल्यामुळे त्वचेचा दाह होऊ शकतो. ब्लीचमधल्या काही घटकांमुळे त्वचेवर पुरळ येऊ शकतं. त्यामुळे ब्लीच फार वेळ ठेऊ नये.

आजीबाईचा बटवा

### पोषक घटकांनी समृद्ध खजूर



थंडीत खजूर खाल्ला जातो. खजूर आरोग्यदायी आणि पोषक घटकांनी समृद्ध आहे. खजुरात फायबर, प्रथिनं, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबं, मँगनिज, लोह आणि बी ६ हे जीवनसत्त्व हे घटक असतात. खजुरांमुळे झटपट ऊर्जा मिळत असल्यामुळे अशक्तपणा दूर करण्यासाठी त्यांचं सेवन करायला हवं. खजूर शक्यतो सकाळच्या वेळेत खायला हवा. खजुरात विरघळणारं फायबर असल्यामुळे पचनसंस्थेच्या तक्रारी, बद्धकोष्ठता दूर होते. खजुरातल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. खजुरातले घटक कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी करून हृदयाला बळकटी देतात. खजुरांच्या नियमित सेवनामुळे हाडांना बळकटी मिळते. यातल्या 'क' जीवनसत्त्वामुळे हाडांची घनता वाढते. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेतही खजुराची महत्त्वाची भूमिका असते. सकाळी व्यायाम करणारे दिवसाची सुरूवात खजुराने करू शकतात. खजुरामुळे मेंदूला चालना मिळते. विस्मरणाची तीव्रता कमी होते.

# जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १ नंबरचा करण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे : आमदार संग्राम जगताप

नगर – उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जिल्ह्यामध्ये राजकीय ताकद मोठी आहे. कार्यकर्त्यांनी जनतेचे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्याचे काम करावे. त्या माध्यमातून नागरिकांचा विश्वास संपादन केला जातो. पक्षाचे संघटन मजबूत असल्यावरती खऱ्या अर्थाने नागरिकांचे काम मार्गी लागत असतात. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता आपला विकासाचा अजेंडा तयार करून गाव पातळीवर, वार्डात काम करावे, आम्ही आमचा अजेंडा तयार करून काम करतो. निवडणुकीमध्ये विजय मिळवण्यासाठी सातत्याने काम करत राहणे गरजेचे आहे, पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाला नगर जिल्ह्यातून कार्यकर्ते जाणार आहे, जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघातील राजकीय भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे त्यानुसार आपण सर्वांनी काम करावे. पक्षामधील मतभेद बाजूला ठेवून नवीन फळी तयार करा, मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे काम देखील सुरू करा. जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एक नंबरचा करण्यासाठी काम करावे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन १० जून रोजी पुणे बालेवाडी येथे होणार असून त्या कार्यक्रमाच्या नियोजनाच्या बैठकीत आमदार संग्राम जगताप बोलत होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन १० जून रोजी पुणे बालेवाडी येथे होणार असून त्या कार्यक्रमाच्या नियोजनाच्या बैठकीत आमदार संग्राम जगताप बोलत होते. (छाया – लहू दळवी)

यावेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, राजेंद्र नागवडे, घनश्याम शेलार, प्रा. माणिकराव विधाते, प्रशांत गायकवाड, अभिजीत खोसे, संतोष धुमाळ, सुमित कुलकर्णी, अशोक चोभे, बाळासाहेब शिंदे, विजय देशपांडे, संजय कोळगे, सचिन डेरे, संध्या सोनवणे, महिला शहर जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, सुषमा रावडे आदी उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पुणे येथे पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. नगर जिल्ह्यातून सर्वात जास्त कार्यकर्ते सभेला जाणार आहे, आपल्या जिल्ह्यामध्ये विधानसभेचे ४ आमदार असून एक विधान परिषदेचे आमदार आहे त्यामुळे पक्षाची ताकद मोठी आहे, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाची ताकद दाखवी लागेल, वेळ पडल्यास स्वतंत्रपणे निवडणुका लढण्याचा निर्णय झाल्यास आपली स्वतंत्र तयारी असणे गरजेचे आहे. कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये राहून पक्षाचे काम करावे व शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत घेऊन जाव्यात असे ते म्हणाले

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांनी पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या मेळाव्याच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली.

### आ. गोपीचंद पडळकर व लक्ष्मण हाके यांचा पक्षाच्यावतीने निषेधाचा ठराव मंजूर

आ. गोपीचंद पडळकर व लक्ष्मण हाके या दोन व्यक्ती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सातत्याने बिनबुडाचे आरोप करत टीका करत असतात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या निषेधाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे, वेळ पडल्यास नगर जिल्ह्यामध्ये या दोघांना त्यांची जागा दाखवली जाईल असा इशारा बाळासाहेब शिंदे यांनी दिला.

## ११ वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धेचे अहिल्यानगरमध्ये आयोजन

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेमार्फत ११ वर्षांच्या खालील खेळाडू म्हणजे १/१/२०१४ नंतर जन्मलेले नगर जिल्ह्यातील खेळाडू या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेऊ शकतील.

नगर येथील शांती जूनियर्स, आदर्श कॉलनी, साधना हौसिंग सोसायटी, प्रोफेसर चौक, अहिल्यानगर येथे सदरील स्पर्धेचे नियोजन केले असून ८ जून रोजी सकाळी ९.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन केले जाईल. पुणे येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे. अंतिम निकाल पत्रकाप्रमाणे २ मुले व २ मुली, म्हणजेच प्रथम २ खेळाडू राज्यस्तरावर पाठविण्यात येतील. अहिल्यानगर जिल्ह्यातून निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी, रू १००० संघटनेमार्फत भरली जाईल व तेथे राहण्याची व्यवस्था सुद्धा केली जाईल तसेच पहिल्या पाच खेळाडूंना (मुले व मुली) आकर्षक करंडक सुद्धा देऊन गौरविण्यात येणार आहे

स्पर्धा ११ वर्षाखालील मुले व मुली खेळाडूंसाठी खुली असून खेळाडूंनी येताना बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी आणावे. सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रवेश ऑनलाईन स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना प्रयत्नशील असून अहिल्यानगर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा. निवड चाचणी स्पर्धेतील प्रवेश नोंदणी करता व अधिक माहितीकरिता – यशवंत बापट ९३२६०९२५०१, पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८, प्रशांत धंगेकर ९९२१३७७९८८, देवेंद्र ढोकळे ८६००४१२६३३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेने केले आहे.

## के. के. रेंज जवळ वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर पकडला

### १० लाखांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त, चालक झाला पसार

नगर – लष्कराचे सराव क्षेत्र असलेल्या के. के. रेंज जवळ नांदगाव शिवारात विनापरवाना वाळूचे उत्खनन करुन वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर एमआयडीसी पोलिसांनी ४ जून रोजी रात्री पकडला आहे. या कारवाईत पोलिसांनी १० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून कारवाई दरम्यान ढंपर चालक पसार झाला आहे.

याबाबत के. के. रेंज येथे नियुक्तीस असलेले मेजर जितेंद्र जगवीर सिंग (वय ४६) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे सहकारी जवान हे रात्रीच्या वेळी गस्त घालत असताना नांदगाव शिवारातून के. के. रेंजजवळ एक टाटा कंपनीचा राखाडी रंगाचा डंपर वाळूचे उत्खनन करुन बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक करताना मिळून आला. ते ढंपरकडे जात असताना त्यांना पाहून ढंपर चालक ढंपर तेथेच सोडून पसार झाला. त्यांनी ही बाब पोलिसांना कळविली. पोलिसांनी घटनास्थळी जावून १० लाख रुपये किमतीचा वाळू भरलेला ढंपर (क्रमांक नसलेला) जप्त केला. याप्रकरणी अज्ञात ढंपर चालकाविरुद्ध बी एन एस कायदा कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नगर शहरात तिरंगा सन्मान यात्रा; भारतीय सेनेच्या शौर्याला सलाम

नगर – शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या शौर्याच्या सन्मानार्थ तिरंगा सन्मान यात्रा काढण्यात आली. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन तिरंगा सन्मान यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. मार्केटयार्ड परिसरातून रॅलीचे मार्गक्रमण झाले. यावेळी भारत माता की जय..., भारत जिंदाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद!, वंदे मातरम...च्या घोषणांनी परिसर दणाणला.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले व जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या नेतृत्वाखाली या तिरंगा सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा झेंडे घेऊन रिपाईचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व बौध्द भिक्खू रॅलीत सहभागी झाले होते.



शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या शौर्याच्या सन्मानार्थ तिरंगा सन्मान यात्रा काढण्यात आली.

याप्रसंगी रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, भनते संजय कांबळे, जिल्हा सरचिटणीस विजयराव भांबळ, गणेश कदम, शिवाजीराव साळवे, राजा जगताप, कविता नेटके, माया जाधव, अमित काळे, बाळासाहेब नेटके, बापू जावळे, अविनाश घोडके, काळू ससाने, शितल घोडके, रोहित कांबळे, निखिल सूर्यवंशी, योगेश घोडके, पप्पू जगताप, उत्कर्ष भालेराव, आदर्श साळवे उपस्थित होते.

सुनील साळवे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आपल्या भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना कठोरपणे उत्तर दिले आहे, ज्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला आहे. भारतीय सैनिकांनी दहशतवादी आणि त्याला पोसणाऱ्या पाकिस्तानला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला. भारतीय सैनिकांचे बलिदान आणि त्यांचा पराक्रम देशाच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्व रिपाईचे कार्यकर्ते त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी एकत्र आले असल्याचे त्यांनी सांगितले.

## दुर्घटनाग्रस्त रासने कुटुंबियांना ४ लाख रुपयांच्या शासनाच्या मदतीचा धनादेश सुपूर्द

नगर – शहरात २७ मे रोजी पडलेल्या अवकाळी पावसात सावित्रीबाई फुलेनगर (सारसनगर) भागातील संदीपनगर येथील तन्वी केदार रासने या युवतीचा रहात्या घराचा स्लॅब कोसळून मृत्यू झाला होता. याप्रकरणी रासने परिवारास शासनाची मदत मिळावी यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाठपुरावा करून चार लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली. याचा धनादेश आ.संग्राम जगताप, प्रांताधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार संजय शिंदे यांनी तन्वी रासनेचे वडील केदार व आई वैशाली यांच्याकडे शनिवारी सुपूर्द केला. यावेळी भाऊक झालेल्या रासने कुटुंबियांचे डोळे पाणावले. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागणारे व संजय चोपडा, दुर्वेश रासने, अजय कुंभकर्ण आदी उपस्थित होते.

शासनाने दिलेल्या या मदतीत अजून भर घालून कै.तन्वी रासने हिच्या स्मरणार्थ सेवाभावी ट्रस्टची स्थापना करून गरीब गरजू विद्यार्थ्यांना व नागरिकांना मदत करणार असल्याचे केदार रासने यांनी सांगितले.



घराचा स्लॅब कोसळून मृत्यू झालेल्या तन्वी केदार रासने या युवतीच्या वारसांकडे शासनाच्या मदतीचा धनादेश आ.संग्राम जगताप, प्रांताधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार संजय शिंदे यांनी सुपूर्द केला. (छाया – लहू दळवी)

आ.संग्राम जगताप म्हणाले, २७ मे रोजी घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी होती. अशी वेळ कोणावरही येऊ नये. पावसाळ्यात सर्वांनी आपल्या घराची काळजी घेणे आवश्यक आहे. दुर्घटनाग्रस्त रासने परिवारास शासनाकडून नैसर्गिक आपत्ती दुर्घटनेमुळे आर्थिक मदत मिळावी यासाठी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. त्यानुसार काही दिवसातच रासने कुटुंबीयांना चार लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. तन्वीच्या स्मरणार्थ गरीब गरजू विद्यार्थ्यांना व नागरिकांच्या मदतीसाठी सेवाभावी ट्रस्टची स्थापना करण्याचा रासने परिवाराचा निर्णय योग्य व स्वागतार्ह आहे. अशा सामाजिक उपक्रमांची आज गरज आहे.इयत्ता १२ वीच्या परिक्षेत तन्वी रासने हिने स्वतःच्या हिमतीवर ८५% गुण मिळवले होते. भविष्यात डॉक्टर होण्यासाठी नीट परिक्षेच्या निकालाची वाट पाहणाऱ्या तन्वीवर दुर्दैवाने काळाने असा घाला घातला आहे.

## दारु प्यायला दिली नाही म्हणून डोक्यात फोडली काचेची बाटली

नगर – दारु प्यायला न दिल्याच्या कारणावरुन राग आल्याने एकास शिवीगाळ, धक्काबुक्की करीत काचेच्या बाटलीने डोक्यात मारुन दुखापत केल्याची घटना नगर–पाथर्डी रोडवरील शहापूर येथील हॉटेल पर्वत येथे ५ जून रोजी रात्री घडली.

या बाबत अदमअली तुराब पिरजादे ( वय ५३, रा.मिरजगाव, चेडे मळा, यतिमखाना जवळ, ता. कर्जत) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की आरोपी आयाज इलीयास पठाण (रा. बारा बाभळी, ता.नगर) याने फिर्यादीस दारु पिण्यास मागितली असता फिर्यादी याने दारु देण्यास नकार दिला. याचा आयाज पठाण यास राग आल्याने त्याने फिर्यादीस शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. तसेच काचेची बाटली फिर्यादीच्या डोक्यात मारुन फोडली. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यात दुखापत होऊन ते जखमी झाले. त्यावेळी आयाज पठाण तिथून निघून गेला.

याप्रकरणी अदमअली पिरजादे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी आरोपी आयाज पठाण विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## पावसामुळे नुकसान झालेल्या केडगाव अमरधाम, आंबेडकर भवनाची मनपा आयुक्तांकडून पाहणी

### पडलेल्या भिंती बांधण्याचे काम तत्काळ सुरू करुन स्मशानभूमीतील तुटलेल्या जाळ्या लवकरच बसवण्याचे यशवंत डांगे यांचे आश्वासन

नगर – पावसामुळे महानगरपालिकेच्या केडगाव अमरधाम व आंबेडकर भवनाची भिंत खचून पडली आहे. या दोन्ही भिंती नव्याने बांधण्यात येणार असून, त्याचे काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, केडगाव अमरधाम स्मशानभूमीतील दहन ओट्यावरील जाळ्या तुटल्या आहेत. त्याची दुरुस्ती व नवीन जाळ्या लवकरच बसवण्यात येतील, असे आश्वासन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिले.

यशवंत डांगे यांनी शनिवारी सकाळी केडगाव परिसरात पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक मनोज कोतकर उपस्थित होते. यशवंत डांगे यांनी केडगाव अमरधाम येथे पडलेल्या भिंतीची पाहणी केली. तसेच, स्मशानभूमीतील अंतर्गत सुविधांचीही त्यांनी पाहणी केली. तेथील जाळ्यांची दुरवस्था झाल्याने अंत्यसंस्कार करताना अडचणी येतात, त्यामुळे या जाळ्यांची दुरुस्ती किंवा नवीन जाळ्या बसवणे आवश्यक असल्याचे कोतकर यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणले.



पावसामुळे नुकसान झालेल्या केडगाव अमरधाम, आंबेडकर भवनाची आयुक्तांकडून पाहणी करण्यात आली.

तसेच, आंबेडकर भवनाच्या भिंतीचीही आयुक्तांनी पाहणी केली. अमरधाम व आंबेडकर भवन या दोन्ही ठिकाणी भिंत बांधण्याचे काम तत्काळ सुरू होईल. त्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. केडगाव अमरधाम स्मशानभूमी येथील जाळ्या बसविण्याबाबत तत्काळ प्रशासकीय प्रक्रिया करून काम सुरू केले जाईल, स्मशानभूमीत इतर सुविधांच्या सुधारणेबाबतही लवकरच कार्यवाही केली जाईल, असे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

## भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस व महसूलमंत्री बावनकुळे यांची भेट

नगर – भारतीय जनता पार्टीचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी नुकतीच मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेऊन जिल्हाध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल आभार मानून सत्कार केला. तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही प्रदेश कार्यालयात भेट घेऊन त्यांचेही आभार मानले. यावेळी मंत्री गिरीश महाजन व शहर उपाध्यक्ष अशोक गायकवाड उपस्थित होते.



अहिल्यानगर भाजपाचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी नुकतीच मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी शहर उपाध्यक्ष अशोक गायकवाड उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनिल मोहिते यांना शुभेच्छा देऊन पक्षाचे काम वाढवून पक्षाचे ध्येयधोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवून त्यांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य द्या, असे सांगितले.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीची तयारी सुरु करण्यास सांगून, अहिल्यानगर महानगरपालिकेवर भाजपचा झेंडा फडकावण्यासाठी कटीबद्ध व्हा, असा आदेश दिला.

अनिल मोहिते म्हणाले, भारतीय जनता पक्षाने मला जिल्हध्यक्षपदाची संधी देऊन दिलेली जबाबदारी मी सर्वांना बरोबर घेत काम करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करून शहरात पक्षाची ताकद वाढवणार आहे.

## पैशांसाठी महिलेस मारहाण, पोलिस अधिक्षकांकडे तक्रार : गुन्हा दाखल न केल्यास आमरण उपोषण करणार

नगर – व्याजाने घेतलेले पैसे परत दिल्यानंतरही अवाढव्य व्याज शिल्लक असल्याचे सांगत त्या पैशांची मागणी करत महिलेस व तिच्या कुटुंबियांस मारहाण करण्यात आली आहे. या संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची मागणी पीडित महिलेने पोलीस अधीक्षक यांचेकडे केली. न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे दिला.

याबाबत सौ. वैशाली उमेश सावंत (रा. रेणुकामाता कॉलनी, केडगांव) यांनी पोलीस अधीक्षक यांचेकडे दिलेल्या अर्जात म्हटले आहे की वैशाली सावंत यांनी दोन वर्षापूर्वी केडगाव येथील एका व्यक्तीकडून १ लाख रुपये १५ टक्के व्याजाने घेतले होते. सावंत या दोन वर्षापासून त्याला नियमित व्याज देत होत्या. तसेच त्या व्यक्तीला ऑनलाईन १ लाख २० हजार रुपये दिले. तसेच त्यांनी बऱ्याच वेळा रोख स्वरुपात सुध्दा व्याज अदा केलेले आहे. तरी गेल्या सहा महिन्यापासून सावंत यांची परिस्थिती हलाकीची असल्यामुळे त्यांनी त्यास व्याज देणे बंद केले.

तसेच त्याला दिलेल्या कोऱ्या चेकची मागणी केली असता त्याने आज पर्यंत तुमच्याकडे ३ लाख ५० हजार रुपये बाकी आहे ते तुम्ही द्यावेत अन्यथा निगोशिएट ॲक्ट १३८ नुसार तुमच्यावर कारवाई करील अशी धमकी दिली. त्यावेळी त्यांच्यात शाब्दीक बाचाबाची झाली. ही व्यक्ती सावंत यांना रात्रंदिवस फोनवर त्रास देऊन जीवे मारण्याची धमकी देत आहे. ५ जून रोजी त्याने व त्यांचे आई–वडिल व भाऊ यांनी सावंत यांचे घरी येऊन खूप जोरजोराने भांडण केले. व त्यानंतर सावंत यांच्या कुटूंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी घाबरुन त्या बेशुध्द झाल्या. त्यांना दवाखान्यात नेले असता तेथून बाहेर येत असता सावंत यांना त्याची आई, भाऊ, बहिण यांनी मारहाण केली. सावंत यांना त्यांच्या घरीही मारहाण केली. या बाबत सावंत या कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरिता गेल्या असता. पोलिसांनी त्यांचे ऐकून न घेता गुन्हा दाखल करण्याऐवजी अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद केली, असे या निवेदनात म्हंटले आहे.

पोलीस अधीक्षक यांनी झालेला या घटनेबाबत चौकशी करुन योग्य तो गुन्हा नोंदवण्याचे आदेश द्यावेत. असे न झाल्यास पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर न्यायासाठी आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

